साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस, पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी
कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १९.०५.२०२६ | अंक नं. ०४१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

अधिक मास
आता बनवा अधिक खास
खास धोंड्यानिमित्त जावाई व मुलीला वाण देण्यासाठी आकर्षक व वेगवेगळ्या वजनामधील चांदीची भांडी उपलब्ध.
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# पेट्रोल व डिझेलच्या दरात ४ दिवसांत दुसऱ्यांदा वाढ

## डिझेलच्या विक्रीवर पंपचालकांना कंपन्यांनी घातल्या मर्यादा

नगर – अवघ्या चार दिवसात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलच्या दरात ९१ पैशांनी तर डिझेलच्या दर ९४ पैशांनी वाढ करण्यात आली आहेत. त्यामुळे नगर मध्ये पेट्रोलचा दर थेट १०७.९७ तर डिझेलचा भाव प्रति लिटर ९४.५२ रुपयांच्या घरात पोहोचला आहे. तसेच डिझेलच्या विक्रीवरही कंपन्यांनी पंपचालकांना मर्यादा घातल्या आहेत. त्यामुळे एका व्यक्तीला एका वेळेस २०० लिटर डिझेल देता येणार आहे.

यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. १९ मे रोजी सकाळपासून हे नवे दर लागू झाले आहेत. अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा दरवाढ करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण होण्याची शक्यता आहे.

इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाचे दर कडाडले आहेत. त्यामुळे भारतीय पेट्रोलियम कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत होता. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका संपताच केंद्र सरकारने यापैकी काही भार सर्वसामान्यांवर टाकायचे ठरवले असून त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या भावात वाढ होताना दिसत आहे. अवघ्या चार दिवसांमध्ये दुसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढल्याने सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. आगामी काळात खनिज तेलाचे दर वाढून पेट्रोलियम कंपन्यांचा तोटा कायम राहिल्यास पेट्रोल आणि डिझेलचे दर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

### एका वेळी २०० लिटर डिझेल विक्रीची मर्यादा

दरम्यान पेट्रोलियम कंपन्यांनी पंपचालकांना एका वेळी एका व्यक्तीला २०० लिटर डिझेल विक्री करण्याच्या मर्यादा घातल्या आहेत. २०० लिटर पेक्षा जास्त डिझेल एकावेळी दिले तर पंप आपोआप लॉक होत आहे. त्यामुळे विविध कंपन्या, पोकलेन, जेसीबी सारखे मशिनरी व्यावसायिक यांची डोकेदुखी वाढली आहे. पंपचालकांना कंपन्यांच्या डेपो मधून पेट्रोल डिझेल पुरवठा उशिराने होऊ लागला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पेट्रोल पंप बंद ठेवावे लागत असल्याचे चित्र नगर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात दिसू लागले आहे.

# विधान परिषद मतदारसंघ निवडणुकीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यात 'आचारसंहिता' सुरु

## ४६१ मतदार बजावणार मतदानाचा हक्क : जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर केली असून अहिल्यानगर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाली आहे. निवडणूक शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) दत्तात्रय कवितके, तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, या निवडणुकीसाठी २५ मे रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार असून १ जूनपर्यंत उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून ४ जून ही अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत राहणार आहे. १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. तर २२ जून रोजी मतमोजणी होऊन २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

नामनिर्देशनपत्रे जिल्हाधिकारी यांचे दालन, दुसरा मजला जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराचे महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही विधानसभा मतदारसंघात नाव असणे बंधनकारक असून त्याची साक्षांकित प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट, नगरपरिषदा व नगरपंचायतींचे सदस्य मतदार म्हणून सहभागी होणार आहेत. अहिल्यानगर महानगरपालिका, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, देवळाली प्रवरा, पाथर्डी, श्रीगोंदा, शिर्डी, शेवगाव, कर्जत, अकोले, जामखेड व पारनेर येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांचा या निवडणुकीत मतदार म्हणून समावेश आहे. एकूण ४६१ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

निवडणुकीसाठी मतपत्रिकेचा वापर करण्यात येणार असून मतदारांनी पसंती क्रमानुसार मतदान करावयाचे आहे. मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक जम्बो बॅलेट बॉक्सची व्यवस्था करण्यात आली असून मतदान केंद्रांची व्यवस्था संबंधित तहसील कार्यालयां- मध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यात तहसीलदार यांच्या कक्षात मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. तर या निवडणुकीची मतमोजणी जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. निवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गासाठी १० हजार रुपये तर अनुसूचित जाती, जमातीसाठी ५ हजार रुपये इतकी अनामत रक्कम असणार आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ तसेच भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक अथवा खासगी मालमत्तेवर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, झेंडे किंवा घोषणा लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली.

# खरेदीच्या बहाण्याने आले अन् हातचलाखी करत सराफी दुकानातून सोन्याचे मिनी गंठण लांबवले

## सावेडीच्या चंदुकाका सराफ शोरूममधील घटना, ३ महिलांसह १ पुरुषावर गुन्हा दाखल

नगर – सावेडी येथील चंदुकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड शोरूममधून तीन अनोळखी महिला आणि एका पुरुषाने खरेदीच्या बहाण्याने येत २ लाख रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सावेडी शाखेचे सहाय्यक शाखा व्यवस्थापक सुहास बाहुबली भोसेकर यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन अनोळखी महिला आणि एका पुरुषाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावेडीत अपेक्स रुग्णालयाशेजारी चंदुकाका सराफ यांचे शोरूम आहे. १२ मे रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास शोरूममध्ये तीन महिला आणि एक पुरुष ग्राहक म्हणून आले होते. त्यांनी दागिने पाहण्याच्या बहाण्याने काउंटरवरील कर्मचाऱ्याला सोन्याचे पट्टीचे शॉर्ट गंठण दाखवण्यास सांगितले. कर्मचाऱ्याने काही दागिने दाखवले, मात्र ते पसंत नसल्याचे सांगून ते सर्वजण खरेदी न करताच शोरूममधून निघून गेले. त्यानंतर काउंटरवरील दागिन्यांची मोजदाद केली असता, त्यामध्ये एक सोन्याचे मिनी गंठण कमी असल्याचे कर्मचाऱ्याच्या निदर्शनास आले.

संशय आल्याने शोरूममधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासण्यात आले. त्यामध्ये आकाशी रंगाची साडी नेसलेल्या एका महिलेने काउंटरवरील सोन्याचे मिनी गंठण अत्यंत हुशारीने उचलून स्वतःच्या साडीत लपवल्याचे स्पष्ट दिसले. चोरट्यांनी १६ ग्रॅम वजनाचे आणि २ लाख रुपये किमतीचे हॉलमार्क असलेले सोन्याचे मिनी गंठण चोरून नेले आहे. या प्रकरणी १८ मे रोजी पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी करत आहेत.

# धक्काबुक्की करत सोन्याची चेन पळवली

## पाईपलाईन रोडवरील एकविरा चौकातील घटना, एकावर गुन्हा दाखल

नगर – पाईपलाईन रोड परिसरातील एकविरा चौकात एका दारुड्या भामट्याने भररस्त्यात धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली आहे. रस्त्याच्या कडेला उभे राहून कुटुंबाशी मोबाईलवर बोलत असलेल्या एका नागरिकाला गाठून, आरोपीने आधी त्यांचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना जबरदस्तीने धक्काबुक्की करत, शिवीगाळ करून गळ्यातील ५५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन तोडून तो पसार झाला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत संतोष विठ्ठलराव गुरळे (वय ४७, रा. साईदीप नगर, शिरसाठ मळा, पाईपलाईन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १३ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास एकविरा चौकात संस्कृती वाईन्स समोर रस्त्याच्या कडेला उभे होते. ते आपल्या कुटुंबातील व्यक्तीशी फोनवर बोलत असताना, अचानक तिथे एक दारू पिलेला अनोळखी इसम आला. त्याने संतोष यांच्या हातातील फोन हिसकावला. संतोष यांनी प्रतिकार करत फोन परत मिळवला. याचा राग आल्याने त्या अज्ञात आरोपीने संतोष यांना गाठून जोरदार धक्काबुक्की केली व अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

यात आरोपीने संतोष यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन जबरदस्तीने तोडली आणि तिथून धूम ठोकली. संतोष यांनी तत्परता दाखवत चोरट्याला पकडण्यासाठी त्याचा पाठलाग केला, परंतु तो चोरटा जवळच असलेल्या एका इमारतीमध्ये अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. अखेर या प्रकरणी संतोष गुरळे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध बीएनएस कलम ३०९ (४) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण करत आहेत.

# जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या चाऱ्याची इतर जिल्ह्यांत वाहतूक करण्यास प्रतिबंध

नगर – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करत जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यात उत्पादित होणारा हिरवा व कोरडा चारा, मुरघास आणि टोटल मिक्स राशन (टी.एम.आर.) यांची इतर जिल्ह्यांत वाहतूक करण्यास मनाई करणारा आदेश जारी केला आहे. पुढील दोन महिन्यांसाठी हा आदेश लागू राहणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

कशाला घेता ३इन १ व ४ इन १ जेव्हा रु.५० मध्ये मिळतोय
लाभच लाभ शुभलाभ ६ इन १ ६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ बेस्ट ६ ६ इन १ १२०ग्रॅम
रु. 65 चा रु. 50 मध्ये
तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी निळकंठ, अगरबत्तीचे विक्रेते
स्टॉ. केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर आडते बाजार अ.नगर

अकोले तालूक्यातील सुप्रसिद्ध
इंद्रायणी तांदूळ मिळेल
ध्येय ॲग्रो
9623576711

ADMISSION OPEN
MAHA DISCOUNT
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
www.dishagroup.in
JUST IN ANY COURSE 1800/-
COURSES
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, INDESIGN C, C++, CANVA, CHATGPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate.
9371051769
Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Mallwada Stand, Station Road.
9371151769
Pipeline Branch
Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road.
7447761769

भावपूर्ण आदरांजली



जीवन ज्योत सरते..
स्मृती मनात उरते...
पतसंस्थेच्या विद्यमान संचालिका व पतसंस्थेच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या
स्व. सौ. प्रिती प्रतिक बोगावत
(स्व. दि. १७-०५-२०२६)
यांच्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !
प्रशांत भंडारी (सरव्यवस्थापक) | शैलेश गांधी (व्हा. चेअरमन) | अभय पितळे (चेअरमन)
संचालक – संतोष गांधी । मनोज गुंदेचा । समीर बोरा
चेतन भंडारी । विनित बोरा । ॲड. आनंद फिरोदिया
सौ. सुवर्णा डागा । शरद गोयल
तज्ञ संचालक – शांतीलाल गुगळे । सीए डॉ. परेश बोरा व सर्व कर्मचारी वृंद
SSGJOP
सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्था मर्या., अहिल्यानगर.
सिटी सर्व्हे नं. ३६२३, बँक रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ - २३५४२९५, २३२३३०५,
शाखा - मार्केट यार्ड, अहिल्यानगर. फोन : ०२४१-२४५११९५, मो. ८८०९८८०९२५
E-mail : jainoswalpatsanstha@gmail.com

महात्मा फुले जन आरोग्य योजना
सर्व रंगाच्या शिधापत्रिका धारकांना मिळणार योजनेचा लाभ
MJPJAY
फक्त लहान मुलांसाठी मोफत आंतररुग्ण सेवा
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटी शेजारी, अ.नगर येथे उपलब्ध आहे.
त्यासाठी लागणारे कागदपत्रे : १) रेशन कार्ड सर्व रंगांचे २) आयुष्यमान कार्ड कुटुंबातील व्यक्तिचे ३) आधारकार्ड रुग्णाचे
अक्षय (गिते) हॉस्पिटल डॉ.अनिरुध्द गिते (MBBS, MD paeds) मो : 9511110444 / 9881800444

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्हा रुग्णालयातील प्रशिक्षण केंद्रातून खिडकीचे गज तोडून विविध साहित्य केले लंपास

नगर - शहरातील सिव्हील हॉस्पिटल आवारात असलेल्या जिल्हा प्रशिक्षण केंद्रात अज्ञात चोरट्यांनी खिडकीचे गज तोडून आत प्रवेश करत कार्यालयातील मौल्यवान इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर साहित्य असा एकूण २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. या घटनेमुळे शासकीय कार्यालयांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

याप्रकरणी केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री संभा शिंदे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शासकीय सुट्टी असल्यामुळे १५ मे च्या संध्याकाळपासून १८ मे च्या सकाळपर्यंत कार्यालय बंद होते. सकाळी कर्मचारी योगेंद्र पालवे कार्यालयात आले असता, त्यांना दरवाजा आतून बंद असल्याचे आणि वातानुकूलित यंत्र (एसी) सुरू असल्याचे आढळले. संशय आल्याने त्यांनी तात्काळ डॉ. शिंदे यांना माहिती दिली.

पोलिसांच्या मदतीने आत प्रवेश केला असता, कार्यालयातील कपाटे उघडी आणि साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरट्यांनी मागील खिडकीची भिंत तोडून आणि लोखंडी गज मोकळे करून आत प्रवेश केला होता. चोरट्यांनी कार्यालयातून १ म्प्लीफायर, २ प्रोजेक्टर, ३ कॉम्प्युटर साऊंड सिस्टीम, ३ गिझर, १ डीव्हीडी प्लेअर, २ माईक स्टँड, व्हिडिओ कॅमेरा, फोटो कॅमेरा आणि ६० फूट केबल वायर चोरून नेली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण केले होते. या चोरीचा पुढील तपास पोलीस अंमलदार सुनील आंधळे करत आहेत.

# अहिल्यानगर महापालिका घनकचरा विभागातील अनागोंदी कारभार थांबवा; अन्यथा सफाई, चेंबर व गटार कामगारांचे २२ मे पासून बेमुदत 'धरणे आंदोलन'


जितेंद्र सारसर


आनंद वायकर

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात सुरू असलेल्या मनमानी आणि अनागोंदी कारभाराविरोधात आता सफाई कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. विभाग प्रमुखांकडून सफाई कामगारांच्या मनमानी बदल्या केल्या जात असून कामगारांवर अन्यायकारक पद्धतीने अतिरिक्त कामाचा बोजा टाकला जात असल्याचा आरोप करत अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन दिले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत निर्णय न घेतल्यास २२ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून महापालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर सफाई, चेंबर व गटार कामगारांचे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला आहे.

कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर आणि सचिव आनंद वायकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घरकचरा व्यवस्थापन विभागामध्ये सुमारे ८०० सफाई कामगारांची संख्या असली तरी प्रत्यक्षात फक्त ६५० च्या आसपास कामगार कार्यरत आहेत. उर्वरित कामगार इतर विभागांमध्ये विविध आदेशान्वये कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत उपनगरांमध्ये कामगारांची संख्या अपुरी असल्याचे कारण देत विभाग प्रमुखांकडून मनमानी पद्धतीने कामगारांच्या बदल्या केल्या जात आहेत. गरज नसताना कामगारांना एका भागातून दुसऱ्या भागात तोंडी आदेशाने पाठविले जात असल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, आधीच अपुऱ्या मनुष्यबळातून काम करणे सफाई कर्मचाऱ्यांना अत्यंत कठीण जात आहे. काही कामगार रजेवर, आठवड्याच्या सुट्टीवर किंवा इतर कारणांनी गैरहजर असतात. त्यामुळे त्यांच्या हद्दीतील कामे देखील उर्वरित कामगारांकडून करून घेतली जातात. त्याचबरोबर स्वच्छता अभियानासाठी प्रत्येक हजेरीवर किमान पाच कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामासाठी बोलावले जाते. परिणामी एका कामगाराकडून दोन-दोन हद्दींची कामे करून घेतली जात आहेत.

कामगार संघटनेने निवेदनात नमूद केले आहे की, सफाई कामगार कोणतीही तक्रार न करता प्रामाणिकपणे काम करत आहेत. ४० अंशापेक्षा अधिक तापमानामध्ये देखील कामगार ईमानेइतबारे सेवा बजावत आहेत. अनेक कर्मचाऱ्यांचे पगार अद्याप झालेले नसतानाही ते सर्व अडचणींना सामोरे जात काम करत आहेत. मात्र विभाग प्रमुखांकडून कामगारांना स्वतःच्या नोकरांप्रमाणे वागणूक दिली जात असून त्यांच्याशी अरेरावीची भाषा वापरली जाते. कामगार काम करत नाहीत, असे खोटे आरोप देखील केले जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

निवेदनात असेही म्हटले आहे की, जर सफाई कामगारांनी कामे केली नाहीत तर शहरातील नागरिकांना रस्त्यावरून चालणे देखील कठीण होईल. तरीही कामगारांशी अन्यायकारक वागणूक केली जात आहे. शहरातील कामगारांना सावेडी, सावेडीतील कामगारांना केडगाव, तर केडगावमधील कामगारांना बुरुडगाव येथे तोंडी आदेशाने बदल्या केल्या जात आहेत. या बदल्या आकसापोटी केल्या जात असल्याची भावना कामगारांमध्ये निर्माण झाली आहे.

यापूर्वी घनकचरा व्यवस्थापन विभागात सफाई कामगार, चेंबर कामगार आणि गटार कामगार स्वतंत्रपणे आपापल्या हद्दीत काम करत होते. त्याच पद्धतीने कामकाज सुरू ठेवण्यात यावे, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. तसेच पत्र देण्यापूर्वी ज्या कामगारांच्या आकसाने बदल्या करण्यात आल्या आहेत, त्यांना तातडीने मूळ जागी परत पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे.

कामगार युनियनने आयुक्तांकडे केलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत - १) आकसाने केलेल्या बदल्या तात्काळ रद्द करण्यात याव्यात. २) चेंबर व गटार कामगारांना पूर्वीप्रमाणेच त्यांच्या-त्यांच्या हद्दीत कामे देण्यात यावीत. शहरातील मध्यवस्तीत अनेक ठिकाणी महापालिकेची मशिन पोहोचू शकत नाही. त्यामुळे त्या भागात अनुभवी चेंबर व गटार कामगारांची आवश्यकता आहे. अशा कामगारांच्या बदल्या करू नयेत. ३) नव्याने सुरू केलेली डेली पद्धत तात्काळ बंद करण्यात यावी. या पद्धतीमुळे कामगारांचा वेळ आणि श्रम वाया जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ४) जुन्या शहर भागात मोठ्या प्रमाणात जयंती, मिरवणुका, धार्मिक उत्सव तसेच बाजारपेठा असल्याने कचऱ्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे त्या भागात अतिरिक्त कामगारांची आवश्यकता असताना तेथील कामगार इतरत्र पाठवू नयेत. ५) घनकचरा व्यवस्थापन विभागातील सुरू असलेला अनागोंदी कारभार तात्काळ थांबविण्यात यावा.

कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर म्हणाले की, सफाई कामगारांवर अन्याय होत असून प्रशासनाकडून त्यांचा मानसिक छळ केला जात आहे. अपुऱ्या मनुष्यबळातून शहराची स्वच्छता राखणारे कर्मचारी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. मात्र त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नाही. आकसाने बदल्या करणे, अतिरिक्त कामाचा ताण देणे आणि अरेरावीची भाषा वापरणे हा प्रकार आता सहन केला जाणार नाही.

सचिव आनंद वायकर म्हणाले की, कामगारांच्या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे. अन्यथा २२ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून महापालिकेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल. आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील.

# चांदणी चौकात तरुणावर दांडक्याने प्राणघातक हल्ला, चौघा जणांवर गुन्हा दाखल

नगर - चांदणी चौक ते स्टेट बँक चौकाकडे पायी जात असलेल्या एका तरुणाला जुन्या भांडणाच्या रागातून चौघांनी लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या हल्लयात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तेजस सतराम दराडे (वय २०, रा. पागुरी पिंपळगाव, ता. पाथर्डी) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा १७ मे रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास चांदणी चौकातून पायी जात होता. त्यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरून आकाश पवार, सोमनाथ गुंजाळ, आदेश थोरात आणि अभि (पूर्ण नाव माहीत नाही, सर्व रा. एकविरा चौक, अहिल्यानगर) हे त्या ठिकाणी लाकडी दांडके घेऊन आले. त्यांनी तेजसला अडवून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी लाकडी दांडक्याने तेजसच्या डोक्यात, पाठीवर, पायावर आणि छातीवर जबर मारहाण केली. या हल्लयात त्याच्या डोक्याला, डोळ्याच्या वर आणि हाता-पायाला गंभीर जखमा झाल्या आहेत.

मारहाण सुरू असताना परिसरातील ओळखीच्या लोकांनी धाव घेऊन तेजसची सुटका केली. त्यानंतर त्याला तातडीने उपचारासाठी जवळील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या धांदलीत फिर्यादी तरुणाच्या गळ्यातील आठ ग्रॅमची सोन्याची चेन देखील गहाळ झाली आहे.

या घटनेनंतर तेजस दराडे याने दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी आरोपींवर गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार बारगजे करत आहेत.

## मनोज नहार यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्री बंगला, स्टेशन रोड येथील रहिवासी मनोज मनसुखलाल नहार (वय ५९) यांचे १९ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, बहीण, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नहार कन्स्ट्रक्शन, नहार ऑटोमॅटीकचे ते संचालक तर जैन ओसवाल पंचायत सभेचे ते माजी विश्वस्त होत.

# माळीवाडा येथे व्यावसायिकाला शिवीगाळ करत दगडाने मारहाण

नगर - शहरातील माळीवाडा भागातील पारिजात लॉज जवळ दारूच्या नशेत एका इसमाने तरुणाला विनाकारण शिवीगाळ करत दगडाने मारहाण करत जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत अक्षय अविनाश रासकर (वय ३८, रा. महात्मा फुले रोड, माळीवाडा) यांनी फिर्याद दिली आहे. अक्षय रासकर हे आपल्या कुटुंबासह माळीवाडा भागात राहतात आणि चहा-नाश्त्याचे दुकान चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. १७ मे रोजी रात्री सव्वा अकरा वाजेच्या सुमारास रासकर हे आपले दैनंदिन काम आटपून पारिजात लॉज जवळ बसले होते. त्यावेळी त्यांच्या ओळखीचा कपिल शर्मा (रा. ब्राह्मणगल्ली, माळीवाडा) हा त्या ठिकाणी आपली गाडी लावून आला. कपिल शर्मा हा दारूच्या नशेत होता. त्याने तिथे येऊन अक्षय यांना कारणाशिवाय घाणेरडी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. अक्षय यांनी त्याला 'विनाकारण शिव्या का देतोस' असे विचारले. याचा राग आल्याने कपिल याने रस्त्यावरील दगड उचलून थेट अक्षय यांच्या डोक्यात मारला. तसेच त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

या हल्लयात अक्षय यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. त्यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवले. रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर अक्षय रासकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी कपिल शर्मा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बाळकृष्ण कुलकर्णी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - नालेगाव, कवडे गल्ली येथील रहिवासी बाळकृष्ण कुलकर्णी (गुरुजी) (वय ३५) यांचे १८ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## दिलीप कटारिया यांचे अल्प आजाराने निधन

नगर - पराग पार्क, मल्हार चौक, स्टेशन रोड येथील रहिवासी



दिलीप चंपालाल कटारिया (वय ७१) याचे १९ मे रोज अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र कटारिया, नीता गुंदेचा, निर्मला गांधी यांचे ते बंधू, हर्षद, पितेश यांचे काका तर परेश, पूनम यांचे वडील होत.

## महादेव वाडेकर यांचे हृदयविकाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी महादेव आनंदा वाडेकर (वय ६०) यांचे १९ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे.

## महादेव वाडेकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी महादेव तुळशीराम



वाडेकर (वय ८८) यांचे १९ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिक्षक बाबासाहेब वाडेकर यांचे ते वडील होत.

## जिजाबाई मोकाटे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - इमामपूर, जेऊर येथील रहिवासी जिजाबाई मारुती



मोकाटे (वय ७५) यांचे १९ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर इमामपूर, भैरवनाथ मळा, मोकाटे वस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब, अर्जुन, नामदेव मोकाटे यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



आध्यात्मिक गुरू व श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष आणि मथुरा कृष्ण जन्मभूमी ट्रस्टचे उपाध्यक्ष स्वामी गोविंद देवगिरि महाराज यांची अहिल्यानगर येथे जगभरात १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके व बी के मधु दीदी यांनी भेट घेऊन संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय असलेल्या आबू राज, राजस्थान ला भेट देण्याचे निमंत्रण देऊन निराकार परमपिता परमात्मा शिवाची तसबीर भेट दिली. यावेळी बी के निशा दीदी उपस्थित होत्या.

## भिंगारमध्ये गळफास घेत तरुणाची आत्महत्या

नगर - राहते घरात गळफास घेत एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना भिंगारच्या सौरभ नगर परिसरात १८ मे रोजी दुपारी उघडकीस आली. रोशन प्रमोद परदेशी (वय २०) असे मयत तरुणाचे नाव आहे. रोशन याने घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्याच्या नातेवाईकांनी त्यास तातडीने खाजगी रुग्णवाहिकेने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.चव्हाण यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतचा अहवाल भिंगार कॅम्प पोलिसांना पाठविण्यात आला. त्यावरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# अहिल्यानगर शहरातील नीट विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाईन

## आत्महत्या नको, धैर्याने पुढे चला : किरण काळे



नगर - पेपर फुटी नंतर नीट- यूजी २०२६ परीक्षेच्या रद्दबातल निर्णयामुळे देशासह अहिल्यानगर शहरातील विद्यार्थी आणि पालक मोठ्या मानसिक तणावाखाली आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे यांनी शहरातील विद्यार्थ्यांना धीर देत आत्महत्या किंवा नकारात्मक विचार न करण्याचे भावनिक आवाहन केले आहे.

अहिल्यानगर शहरातील विद्यार्थी व पालकांच्या समुपदेशनासाठी ठाकरे शिवसेनेच्या वतीने ९०६७९९९९०१ हा हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. तणावग्रस्त विद्यार्थी आणि पालकांनी कोणत्याही वेळी संपर्क साधावा. पालकांनी मुलांशी सकारात्मक संवाद साधावा. त्यांना भावनिक आधार द्यावा आणि त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही किरण काळे यांनी केले.

### चार विद्यार्थी आत्महत्या वेदनादायी

नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर गोवा, राजस्थान, दिल्ली आणि उत्तर प्रदेश येथे किमान चार विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची दुःखद प्रकरणे समोर आली आहेत. त्या अत्यंत वेदनादायी आहेत. त्या पार्श्वभूमीवर किरण काळे यांच्या संकल्पनेतून ठाकरे शिवसेनेने हेल्पलाइनचा सकारात्मक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सरकारने योग्य ती खबरदारी घ्यावी. अशा प्रसंगात विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने पुढे येण्याची गरज असल्याचे काळे यांनी नमूद केले.

### धैर्य ठेवा, स्वतःवर विश्वास ठेवा

एक परीक्षा आयुष्या पेक्षा मोठी नाही. दोन-तीन वर्षांची मेहनत कधीच वाया जात नाही. अपयश, अन्याय किंवा अनिश्चितता आली तरी जीवन संपविण्याचा विचार करू नका. धैर्य ठेवा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि नव्या उमेदीने पुढे जा, असे आवाहन विद्यार्थ्यांना काळे यांनी केले आहे.

काळे म्हणाले की, लाखो विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा दिली. विद्यार्थ्यांची दोन वर्षांची मेहनत पाण्यात गेली, पेपर फुटी, यंत्रणेच्या चुकीची शिक्षा विद्यार्थी, पालकांना का?, सरकार त्यांच्या भविष्या सोबत का खेळत आहे ? सरकारच्या गलथान व भ्रष्ट कारभारामुळे पालकांवर मोठा आर्थिक भार पडला आहे.

### पारदर्शक परीक्षा व्यवस्था उभारा

पेपर फुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे केंद्र सरकार आणि एनटीए वर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दोषींवर कठोर कारवाई, एनटीए मध्ये व्यापक सुधारणा, सुरक्षित व पारदर्शक परीक्षा व्यवस्था, तसेच विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावर मोफत समुपदेशन सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने किरण काळे यांनी केली.

# नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात 'जनआंदोलन' छेडणार

नगर - नीट परीक्षेमधील महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले आहे. नीट परीक्षेमधील कथित महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव राजू शिंदे, निलेश घोडके, फिरोज शेख, बाळकृष्ण काकडे, राम ससाणे, शिवम साळवे, राहुल हरिभगत, उस्मान शेख, राहुल पटेकर, सुरेश गायकवाड, संतोष मोरे, नवनाथ साळवे, छबु मोरे, मच्छिंद्र बर्डे, दत्ता साळवे, अनिल लष्करे, गणेश बागल, श्याम आवटी आदी उपस्थित होते.


नीट परीक्षेमधील महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो होतकरू आणि मेहनती विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा 'नीट पेपरफुटी घोटाळा' अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे.

बहुजन समाज पार्टीने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि मेहनतीचा प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की, देशातील गरीब, दलित, मागासवर्गीय आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थी कर्ज काढून, रात्रंदिवस अभ्यास करून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहतात. मात्र, विद्यमान सरकार आणि NTA च्या निष्काळजीपणामुळे तब्बल २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात लटकले आहे. विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचा आणि पालकांच्या त्यागाचा हा मोठा अपमान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या घोटाळ्याचे महाराष्ट्रातील नाशिकसह इतर भागांशी संबंध असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. पेपर माफिया आणि सफेदपोश गुन्हेगारांचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे समोर येत असून, ही राज्य सरकारच्या गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणेची मोठी अपयशाची बाब असल्याचे बहुजन समाज पार्टीने म्हटले आहे.

परीक्षा रद्द करण्यात आल्याने मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, केवळ किरकोळ आरोपींना अटक करून मुख्य सूत्रधार आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या संपूर्ण प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली वेळबद्ध आणि निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, तसेच दोषींना फाशी सारखी कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. भविष्यात होणारी पुनर्परीक्षा पूर्णतः पारदर्शक, सुरक्षित आणि पेपरफुटीमुक्त वातावरणात घेण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली.

परीक्षा रद्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, आगामी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा प्रवास व इतर लॉजिस्टिक खर्च सरकारने उचलावा, अशी मागणी बहुजन समाज पार्टीने केली आहे. तसेच NTA ची जबाबदारी निश्चित करून त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांना न्याय मिळाला नाही, तर बहुजन समाज पार्टी संपूर्ण महाराष्ट्रात रस्त्यावर उतरून जनआंदोलन छेडेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# गृहिणी

## आरोग्य

### ओव्याचे पाणी पिण्याचे लाभ

रात्री एक चमचा ओवा एक ग्लास पाण्यात भिजत ठेवावा. सकाळी उठल्यानंतर ते पाणी गाळून घ्यावे व कोमट करून रिकाम्या पोटी प्यावे. भिजवलेला ओवा चावून खाणे शक्य असल्यास खावा, अन्यथा टाकून द्यावा. ओव्यात Thymol नावाचे तत्व असते. त्यामुळे गॅस, अपचन, पोट फुगणे, जडपणा या तक्रारी लगेच कमी होतात आणि अन्नपचन सुधारते. ओव्याचे पाणी मेटाबॉलिझम वाढवते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते, पोट स्वच्छ राहते आणि भूक नियंत्रित राहते. ओवा उष्ण गुणधर्माचा असल्याने सर्दी व खोकल्यावर उपयुक्त ठरतो. तो कफ मोकळा करतो व छातीतील कोंड, घशातील खवखव कमी करतो. महिलांसाठी मासिक पाळीतील पोटदुखी, कंबरदुखी व अनियमितता यावर ओव्याचे पाणी फायदेशीर आहे. ते गर्भाशय स्वच्छ करण्यास मदत करते. वाईट कोलेस्ट्रॉल कमी करून हृदयाचे आरोग्य सुधारते व रक्ताभिसरण चांगले होते. सकाळी ओव्याचे पाणी घेतल्याने तोंडातील जंतू नष्ट होतात व दुर्गंधी दूर होते. दाह कमी करण्याचा गुणधर्म असल्याने गुडघेदुखी व संधिवात यामध्ये आराम मिळतो. लघवी स्वच्छ होत असल्याने लहान आकाराचे मुतखडे विरघळण्यास मदत होते.

## पाककला

### मसाला पापड

**साहित्य** : पापड २ नग मोठे उडीदाचे किंवा जिरेमिरे पापड चालतील कांदा १ मध्यम, बारीक चिरलेला टोमॅटो १ मध्यम, बिया काढून बारीक चिरलेली हिरवी मिरची १, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, बारीक चिरलेली चाट मसाला अर्धा चमचा, लाल तिखट पाव चमचा, लिंबू अर्धा, मीठ चवीनुसार, पापड खारट असल्याने कमी घालावे, शेव २ चमचे

**कृती** : पापड गॅसच्या मंद आचेवर चिमट्याने धरून दोन्ही बाजूने कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. करपणार नाही याची काळजी घ्या. पापडाला थोडे तेल लावून ३०-४० सेकंद मायक्रोवेव्ह करा. कढईत तेल गरम करून पापड २-३ सेकंद तळून काढा. याने पापड जास्त कुरकुरीत होतो. कागदावर ठेवून जास्तीचे तेल काढून टाका. एका बाऊलमध्ये बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, हिरवी मिरची व कोथिंबीर एकत्र करा. त्यात चाट मसाला, लाल तिखट व चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. शेवटी अर्धा लिंबू पिळा. भाजलेला पापड एका प्लेटमध्ये ठेवा. त्यावर तयार केलेला मसाला सगळीकडे सारखा पसरवा. वरून थोडी शेव भुरभुरावी.

## वास्तू

### मुख्य दरवाजा

* मुख्य दरवाजा घरातील इतर दरवाजांपेक्षा उंच व मोठा असावा. त्याची उंची रुंदीच्या दुप्पट असावी.

* शक्यतो मुख्य दरवाजा दोन पाळीचा असावा. एक पाळीचा असेल तरी चालेल, पण दोन पाळी शुभ.

* दरवाजा चौकोनी असावा. वरून कमानदार किंवा त्रिकोणी आकार टाळावा.

* दरवाजा नेहमी घराच्या आतल्या बाजूने उघडला पाहिजे.

## सौंदर्य

* ताजी कोरफड घेऊन त्यातील जेल भुवयांना लावावे. ३० मिनिटांनी धुवावे. भुवया मऊ व चमकदार होतात.

* कापसाच्या बोळ्याने थोडे कच्चे दूध भुवयांवर लावावे. याने भुवया मुलायम राहतात.

## सल्ला

कणिक मळताना पाण्याऐवजी दुधाचा वापर करा किंवा मळलेल्या कणकेत थोडे तेल लावल्यास पोळ्या मऊसुत होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

बुधवार, दि. २० मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, आर्द्रा ०६।१२, पुनर्वसू २८।१२, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : अडलेली कामे पूर्ण होतील. नोकरीत चांगले परिणाम मिळतील. व्यापारात लाभ. घरात आनंदाचे वातावरण.

**वृषभ** : मनातल्या चिंता कमी होतील. आत्मविश्वास वाढेल. नोकरीत मेहनतीचे फळ मिळेल. विद्यार्थ्यांना दिवस चांगला. व्यवहारात सावध राहा.

**मिथुन** : प्रवासाचे योग आहेत. मित्र भेटतील. कामात धावपळ होईल पण यश मिळेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**कर्क** : कौटुंबिक सुख मिळेल. आईची तब्येत सांभाळा. पैशाची आवक चांगली राहील. मन शांत ठेवा

**सिंह** : मान-सन्मान वाढेल. सरकारी कामे होतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. राग टाळा.

**कन्या** : अभ्यास व करिअरमध्ये प्रगती होईल. अडथळे दूर होतील. तब्येत चांगली राहील.

**तूळ** : जोडीदाराची साथ मिळेल. भागीदारीत फायदा होईल. उधारी देऊ नका. पैशाच्या व्यवहारात सावध राहा.

**वृश्चिक** : शत्रूवर मात कराल. कोर्टाचे काम जिंकाल. दिवस तणावाचा जाऊ शकतो. कुटुंबासोबत वेळ घालवा.

**धनु** : मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल. गुंतवणूक फायदेशीर ठरेल. धार्मिक कार्यात मन रमेल.


**मकर** : घर-जमिनीचे प्रश्न सुटतील. नातेवाईक भेटतील. कामाचा ताण घेऊ नका.

**कुंभ** : धाडस वाढेल. नवीन सुरुवात करायला उत्तम दिवस. भावंडांची मदत मिळेल. सामाजिक कामात यश.

**मीन** : बोलण्याने कामे होतील. पैसा टिकेल. व्यवसायात संघर्षातून यश मिळेल. प्रेम संबंध मधुर राहतील. खर्चावर नियंत्रण ठेवा. कुटुंबाची साथ मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७४३३ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** :- १) भरपूर; खूप; पुष्कळ ४) एकामागोमाग (तलवारीचे वार व त्याचा आवाज) ५) चित्र; ग्राफ ७) रसाने भरलेले; रसाळ ८) शेतात पिकाला पाणी देण्यासाठी खणलेला लहान चर ९) जोराने फ ुटून बाहेर आलेला १३) नारायण! नारायण! असा उद्घोष करीत तिन्ही लोकी फिरणारा ब्रह्मर्षी १४) वरून खाली थेंब थेंब पाणी पडण्याचा आवाज १७) वेतन; पेमेंट १८) मुलगा (स्वत:चा); पुत्र; पूत १९) सोजी; सपीट २१) पिकांवर पडणारा एक रोग; खवा २२) नारायण! नारायण! असा उद्घोष करीत तिन्ही लोकी फिरणारा ब्रह्मर्षी २३) मनाला येईल तसे वागणे

**उभे शब्द** :- १) एकंदरीत; निवड न करता २) पूर्वीच्या काळातील एक वजनी माप ३) सारखा; समान; बरोबर ४) पावलोपावली; पदोपदी ६) लहान मूल; बाळ १०) मस्ती; जोर ११) दबाव; वजन; प्रेशर १२) नटूनथटून गावभर हिंडणारी १५) वजन असलेला; प्रतिष्ठित १६) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप १९) एक पक्षी २०) जोर; उत्साह; दम; बळ २१) आईचा भाऊ; मातुल

### शब्दगंध क्र. ७४३२ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : स्वप्न ती नसतात जी झोपेत पडतात, स्वप्न ती असतात जी झोपू देत नाहीत.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मुंगी स्वतःच्या वजनाच्या पन्नास पट ओझे कशी उचलू शकते आणि माणूस का नाही उचलू शकत?

मुंगी स्वतःच्या वजनाच्या पन्नास पट ओझे कशी उचलू शकते आणि माणूस का नाही उचलू शकत, यामागे कोणतीही जादू नसून शुद्ध विज्ञानाचे नियम आहेत. याचे मुख्य कारण आकाराशी संबंधित असलेला 'स्क्वेअर-क्यूब लॉ' हा नियम आहे. ताकद ही स्नायूंच्या आडव्या छेदाच्या क्षेत्रफळावर अवलंबून असते, म्हणजेच लांबी आणि रुंदीवर. त्यामुळे एखादा जीव जसजसा मोठा होईल तसतशी त्याची ताकद वर्ग पटीने वाढते. याउलट, वजन हे शरीराच्या घनफळावर, म्हणजे लांबी, रुंदी आणि उंची या तिघांवर अवलंबून असते, त्यामुळे वजन घन पटीने वाढते. उदाहरणार्थ, जर एखादी मुंगी एक सेंटीमीटर उंच असेल आणि माणूस तिच्यापेक्षा शंभर पट उंच असेल, तर माणसाची ताकद मुंगीपेक्षा दहा हजार पट जास्त होईल, पण त्याचे वजन दहा लाख पट जास्त होईल. याचा अर्थ असा की मोठे होताना ताकद जरी वाढली तरी वजन तिच्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढते आणि शेवटी ताकद व वजन यांचे गुणोत्तर खूप कमी होते. मुंगी आकाराने अत्यंत लहान असल्यामुळे तिचे स्वतःचे वजन नगण्य असते, परंतु तिच्या आकाराच्या मानाने स्नायूंचे क्षेत्रफळ जास्त असते, म्हणून ती स्वतःचे वजन जवळजवळ विसरूनच पन्नास पट जास्त ओझे उचलू शकते. याशिवाय मुंगीच्या शरीररचनेचाही यात मोठा वाटा आहे. मुंगीचे शरीर बाहेरून कठीण कवचाने बनलेले असते, ज्याला बाह्यकंकाल म्हणतात. हेच कवच तिच्या स्नायूंना आधार देणारी चौकट म्हणून काम करते आणि त्यामुळे तिचे स्नायू अधिक कार्यक्षमतेने जोर लावू शकतात.

मानवाचा सांगाडा शरीराच्या आत असल्याने आपल्याला हा यांत्रिक फायदा मिळत नाही. तसेच मुंगीच्या मानेचे आणि पायांचे स्नायू तिच्या एकूण आकाराच्या प्रमाणात खूप जाड आणि शक्तिशाली असतात, त्यामुळे ती तिच्या डोक्यावरून पूर्ण शरीराचे वजन आणि त्यावरील अतिरिक्त ओझे तोलू शकते. मुंगी इतकी हलकी असते की तिच्यावर गुरुत्वाकर्षणाचा परिणामही अगदी कमी होतो, त्यामुळे स्वतःचे शरीर पेलण्यासाठी तिला फारशी ऊर्जा खर्च करावी लागत नाही. याउलट माणसाला हे शक्य होत नाही कारण आपले स्वतःचेच वजन खूप मोठे अडथळे निर्माण करते.

सत्तर किलो वजनाच्या माणसाला केवळ उभे राहण्यासाठी पाय, कंबर आणि पाठीचे स्नायू सतत कार्यरत ठेवावे लागतात. आपला अंतःकंकाल असल्यामुळे स्नायूंना लीव्हर तत्त्वाचा फायदा कमी मिळतो. याशिवाय मोठ्या शरीरात स्नायूंनी निर्माण केलेली उष्णता बाहेर टाकणे कठीण जाते, तर मुंगीचे शरीर लहान असल्याने लगेच थंड होते. गंमत म्हणजे जर मुंगीला चमत्काराने माणसाएवढे मोठे केले, तर ती स्वतःच्या पायांवर उभीही राहू शकणार नाही कारण स्क्वेअर-क्यूब लॉ नुसार तिचे वजन ताकदीच्या तुलनेत लाखो पटीने वाढेल आणि तिचे पाय त्या वजनाने मोडून पडतील. निसर्गाने प्रत्येक सजीवाला त्याच्या गरजेनुसार आणि आकारानुसार योग्य ताकद दिलेली आहे, त्यामुळेच स्पायडरमॅनसारखी शक्ती प्रत्यक्ष जीवनात शक्य नाही.

### दयाळू हत्ती

खूप पूर्वीची गोष्ट आहे. बोधिसत्व एका जन्मात हत्तीच्या रूपात जन्माला आले होते. ते शरीराने प्रचंड मोठे, सामर्थ्यशाली पण मनाने अत्यंत दयाळू आणि शांत होते. हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या एका घनदाट अरण्यात ते आपल्या कळपाचे नेतृत्व करत होते. त्यांच्या न्यायीपणामुळे आणि प्रेमळ स्वभावामुळे सर्व हत्ती त्यांच्यावर जीव ओवाळून टाकत. एकदा त्या प्रदेशात भयंकर दुष्काळ पडला. नद्या-नाले आटले, तलाव कोरडे पडले आणि झाडांची पानेही पिवळी पडून गळू लागली. हत्तींचा कळप पाण्याच्या शोधात वणवण भटकू लागला. अनेक दिवसांनी त्यांना एक मोठा, पाण्याने भरलेला तलाव दिसला. सर्व हत्ती आनंदाने त्या तलावाकडे धावले. पण तिथे पोहोचल्यावर त्यांना दिसले की त्या तलावाच्या काठावर हजारो ससे राहत होते. हत्तींच्या कळपाने पाणी पिण्यासाठी आणि डबक्यात लोळण्यासाठी तलावात प्रवेश केला, तेव्हा त्यांच्या अवजड पायांखाली शेकडो ससे चिरडले गेले. काही ससे जखमी झाले, काहींची बिळे उद्ध्वस्त झाली आणि संपूर्ण सशांच्या वसाहतीत हाहाकार उडाला.


सशांचा राजा खूप शहाणा होता. त्याने विचार केला की हत्तींशी युद्ध करणे शक्य नाही, पण युक्तीने त्यांना नक्कीच थांबवता येईल. तो एकटाच धैर्याने बोधिसत्व हत्तीसमोर गेला आणि हात जोडून म्हणाला, हे गजराज, तुम्ही जंगलाचे राजे आहात. आम्ही तुमच्या राज्यातले लहानसे रहिवासी आहोत. हा तलाव आमचे एकमेव आश्रयस्थान आहे. तुमच्या कळपामुळे रोज आमचे शेकडो बांधव मरत आहेत. कृपा करून दया करा आणि दुसऱ्या मार्गाने जा. बोधिसत्व हत्तीला हे ऐकून खूप दुःख झाले. त्याला आपल्या कळपामुळे निष्पाप जीव मारले जात आहेत याची कल्पनाच नव्हती. तो तात्काळ आपल्या कळपाला तलावापासून दूर घेऊन गेला आणि सशांच्या राजाला वचन दिले की यापुढे एकही हत्ती या तलावाला त्रास देणार नाही. त्याने आपल्या कळपासाठी दुसरा जलाशय शोधला, जरी त्यासाठी त्यांना खूप लांब जावे लागले तरी चालेल.

पण दुष्ट प्रवृत्ती काही केल्या स्वस्थ बसत नाही. बोधिसत्व हत्तीचा एक सल्लागार हत्ती खूप गर्विष्ठ आणि क्रूर होता. त्याला सशांसाठी मार्ग बदलणे पसंत नव्हते. त्याने मनात ठरवले की या सशांना धडा शिकवायचाच. एके रात्री, जेव्हा सर्वजण झोपले होते, तेव्हा तो गुपचूप एकटाच त्या तलावावर गेला आणि त्याने मुद्दामहून सशांच्या वसाहतीत धुडगूस घातला. त्याने अनेक बिळे पायांनी तुडवली आणि कित्येक सशांना ठार मारले. सकाळी जेव्हा बोधिसत्व हत्तीला हे कळले, तेव्हा त्याला खूप क्रोध आला. सशांचा राजा पुन्हा त्याच्याकडे तक्रार घेऊन आला.

तो म्हणाला, महाराज, तुम्ही वचन देऊनही तुमचा एक हत्ती आमचा नाश करतो आहे. जर तुम्हीच न्याय करत नसाल तर आम्ही कोणाकडे दाद मागायची? बोधिसत्वाने ताबडतोब सर्व हत्तींना एकत्र बोलावले आणि विचारले, काल रात्री तलावावर कोण गेले होते? सर्वांनी मान खाली घातली, पण तो दुष्ट सल्लागार पुढे आला आणि उर्मटपणे म्हणाला, मी गेलो होतो. ते क्षुद्र ससे आपल्याला मार्ग सांगणार का? जंगलाचा राजा हत्ती आहे, ससा नाही. हे ऐकून बोधिसत्व हत्तीला त्याचा उद्दामपणा सहन झाला नाही. तो शांतपणे म्हणाला, खरा राजा तोच असतो जो दुर्बलांचे रक्षण करतो. जो आपल्या ताकदीचा गैरवापर करून निर्दोषांना मारतो, तो राजा नसून राक्षस असतो. सामर्थ्यापेक्षा दया आणि क्षमा मोठी असते. असे बोलून त्याने त्या गर्विष्ठ हत्तीला कळपातून कायमचे हाकलून दिले. नंतर त्याने स्वतः सशांच्या राजाची आणि त्याच्या जखमी प्रजेची क्षमा मागितली आणि त्यांना अभय दिले. त्या दिवसापासून हत्ती आणि ससे गुण्यागोविंदाने नांदू लागले.

**तात्पर्य** : खरी ताकद शरीरात नसून मनाच्या मोठेपणात असते. दुर्बलांवर दया करणे आणि दिलेला शब्द पाळणे हाच सर्वात मोठा धर्म आहे. गर्वाचे घर नेहमीच खाली होते.

## जीवन का अमृत (भाग १)



कुछ भी ब्यौरा नहीं देता है। संतमत की शिक्षाओं में हमें आत्मा का ज्ञान और प्रभु तक की इसकी यात्रा का ज्ञान दिया जाता है।**५७. आपको प्रभु के रास्ते पर चला दिया गया है, जो कि सबसे सहज और आसान रास्ता है। इस रास्ते से भटको नहीं। शरीर से ऊपर उठो और उच्चतर मंडलों में उड़ान भरो, ताकि अपने आपको जानो और स्वयं देखो कि तुम महाचेतनता के महासागर की एक बूँद हो।पूरी सृष्टि

### गुरु की शक्ति

में प्यार फैलाओ। गुरु-शक्ति उदारता से आपके सिर पर कार्यरत है। जैसा बोओगे, वैसा काटोगे। अपने भौतिक प्रवास को नम्रता, सदाचार, सहनशीलता और सहयोग से भरपूर बनाओ। इन सद्गुणों के बिना, महान आध्यात्मिक उड़ानें आपसे दूर रहेंगी।सतर्क रहो! हम निपुणता के रास्ते पर हैं, पर अभी निपुण नहीं बने। गुरुशक्ति में श्रद्धा के साथ अटल और सावधान रहो और दिन-ब-दिन तरक्की करो। सिर पर कार्यरत सतगुरु-शक्ति आपकी रक्षा करती है। उसमें विश्वास रखो। आपको हर जरूरी आंतरिक सहायता मिलेगी। सतगुरु अंतर में इंतजार कर रहा है कि उसके प्रिय बच्चे उस तक आएँ।*५८. धरती पर सभी चेतन जीवों में से सबसे पुराना जीव इंसान है। उसके बनने के बाद ही सभी धर्म और धार्मिक किताबें बनीं। सभी धर्म इंसान के फायदे के लिए बने और इंसान कभी भी किसी एक धर्म के लिए नहीं बना। प्रभु ने इंसान बनाया और इंसान ने धर्म बनाए।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

संभाषणाऐवजी वादविवाद होतात. अशा मीटिंगमध्ये कोणत्या ऊर्जेची आदानप्रदान होईल? कशा प्रकारची नाती निर्माण होतील? आपली अवस्था काय असेल?घरी किंवा कामाच्या ठिकाणी अशा मीटिंगमध्ये आपल्याकडे अधिकार असले तरी आपण संयमाने सगळ्यांचं ऐकून घेतलं पाहिजे. माणुसकीने त्यांच्या मताचा आदर केला पाहिजे. त्यांना प्रेमाने सबल बनवलं पाहिजे आणि संस्थेच्या किंवा कुटुंबाच्या फायद्याच्या दृष्टिकोनातून विचार करण्यासाठी त्यांना प्रेरित केलं पाहिजे. मीटिंगमध्ये

### वादविवाद से बचें

उपस्थित एखाद्याला आपला निर्णय पटत नसेल पण आपल्याला माहित आहे की निर्णय बरोबर आहे तर तो ठामपणे आणि प्रेमाने मांडता आला पाहिजे. इथे मानसिक संतुलन बिघडायला जागा कुठे आहे? स ुरेश ओबेरॉय : पण खूप लोक भांडतात. खूप कॉमन आहे हे.शिवानीदीदी : इतर जे करत आहेत तेच आपण केलं पाहिजे का?सुरेश ओबेरॉय : मला असं म्हणायचंय की मूळ स्वभाव खूप घट्ट असतो. शिवानीदीदी : याचं कारण, संताप आणि 'मीच बरोबर' या विचाराचा मोह आत्म्याच्या शेल्फमध्ये सगळ्यात पुढच्या बाजूला आहे.सुरेश ओबेरॉय : पण आपण कोणाकोणाला शिकवणार?

शिवानीदीदी : आपल्याला फक्त स्वतःला शिकवायचं आहे.सुरेश ओबेरॉय : जेव्हा दिवसभरात खूप लोकांमध्ये वावरतो तेव्हा हे शहाणपण कृतीत आणणं खरंच शक्य आहे?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : बाळा, तुझे वडील काय करतात?

मुलगा : सर, ते खोटं बोलतात. शिक्षक : काय?

मुलगा : अहो, ते नेहमी म्हणतात '२ मिनिटात आलो', पण २ तासांनी येतात!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील सर्वात लोकप्रिय युपीआय पेमेंट बँक कोणती?

– पेटीएम पेमेंटस् बँक

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कारले

६) दमा, सर्दी, खोकला अशा श्वसनमार्गाच्या तक्रारी असतील, तर कारल्याचा रस व तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून वरील विकार दूर होतात.

७) कावीळ या विकारामध्ये ताज्या कारल्याचा रस सकाळ-संध्याकाळ प्यावा, यामुळे कावीळ हा विकार दूर होतो.

८) बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी व पोट साफ होण्यासाठी कारल्याचा रस काढून प्यावा.

९) यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारल्याचा रस अत्यंत उपयुक्त असतो. कारल्याच्या रसामुळे यकृताची हानी भरून येते. १०) स्थूलता या विकारामध्ये वजन कमी करण्यासाठी कारल्याचा रस उपयुक्त ठरतो.

११) कारल्याच्या पानांचा काढा, हळद व तीळतेल उकळून ते तेल त्वचेला लावल्यास जुने त्वचाविकार, तसेच सोरियासिस हा विकार दूर होतो.

१२) स्त्रियांमध्ये बीजांडकोशाला सूज आल्यास कारले बी, मेथी, गुळवेल, जांभूळ बी यांचे चूर्ण करून प्रत्येकी पाच ग्रॅम सकाळ-संध्याकाळ घ्यावे. यामुळे बीजांडकोशाचा आजार कमी होण्यास मदत होते. १३) लघवी होण्यास त्रास होत असेल, तर कारल्याच्या पानांचा एक कपभर रस चिमूटभर हिंग घालून प्यावा. यामुळे लघवी साफ होण्यास मदत होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# मोबाईलवर फिरणाऱ्या अंगठ्यात आलेला मेंदू वाचनातून डोक्यात नेऊन ठेवण्याचे आव्हान

**लेखक शरद तांदळे यांचे मत; अहिल्यानगर जिल्हा वाचनालय व्याख्यानमालेत व्यक्तिमत्वाची जडणघडण व्याख्यानास प्रतिसाद**




अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेत व्यक्तिमत्त्वाची जडणघडण या विषयावर मार्गदर्शन करताना जागतिक कीर्तीचे लेखक शरद तांदळे. यावेळी रसिका नगरकर उपस्थित होते. (छाया – सुरेश मैड)

नगर – मानवी संवेदना कुंठीत होत असताना मोबाईलवर दीड मिनिटाच्या रिल फिरणाऱ्या अंगठ्यात मेंदू आला आहे. वाचन, संवाद, पुस्तके यांच्या माध्यमातून मेंदूला पुन्हा डोक्यात नेऊन ठेवण्याचे आव्हान आज समोर ठाकले असून त्यासाठी प्रत्येकाने डेली रीडर बना असे कळकळीचे आवाहन लेखक, वक्ते शरद तांदळे यांनी व्यक्त केले.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेत व्यक्तिमत्त्वाची जडणघडण या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, डॉ.राजा ठाकूर, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, राहुल तांबोळी, किरण आगरवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुकडवाल आदी उपस्थित होते.

लेखक शरद तांदळे यांनी जीवनातल्या वेगवेगळ्या टप्प्याचा वाचन प्रवास त्यातील प्रेरणा प्रेरणादायी पद्धतीने सांगताना उपस्थितांना आत्मपरीक्षण करावयास भाग पाडले. आपण आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळे साहित्य वाचन करतो परंतु ते अत्यंत सुमार तर कधी केवळ दाखविण्यासाठी असते. अशातून अनेक अनेक जण नको त्या वयात बोलायला लागतात. त्यामध्ये सोशल मीडियावर फिरणारी खोटे मेसेज यातून होणारे मनभेद घातक आहेत. दूषित वातावरणात दुर्दैवाने महापुरुषांचे साहित्यही आता जाती जातीत वाटले जाऊ लागले आहे. यातून मेंदू खराब होण्यास सुरुवात झाली आहे. यामधून मुलांनी नेमके काय वाचायचे? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

सोशल मीडियामुळे अनेक गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. अगदी बालवयातील मुले चंपक न वाचता हॅरीपॉटरची मागणी जेव्हा करतात तेव्हा बालसाहित्यिकांसमोर नव्या पिढीला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या साहित्याची निर्मिती करणे हे मोठे आव्हान असल्याचे तांदळे म्हणाले.

व्यक्तिमत्व विकासामध्ये वाचन हा 'छंद 'नव्हे तर ती 'गरज 'आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आम्ही काय वाचावे ? असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा ज्याचे कार्य आहे त्याचे साहित्य आपण वाचले पाहिजे. कारण पुस्तके ही बाय प्रॉडक्ट आहे. मोटिवेशन पुस्तकांच्या भ्रामक जगात भारतीय संस्कृतीत पैसे कमवण्याबरोबर ते दाखवणे दाखवायचे कुणाला हा प्रश्न पडत नाही कारण आम्ही सर्वांना बरोबर घेऊन चालतो. मोटिवेशनल बरोबर क्शन आणि एक्सेप्टन्स या दोन गोष्टी व्यक्तिमत्व विकासात महत्त्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. रावण पुस्तकाच्या माध्यमातून मानवी सत्य अभ्यासपूर्णपने मांडल्यामुळे लोकांना आपलेसे वाटले. आपले समर्पण असेल तर आपली कोणतीही पार्श्वभूमी, परिस्थिती यशाला अडसर ठरत नाही असेही ते म्हणाले

जगातल्या सगळ्या क्रांत्या पुस्तकांच्या विचारातून झाल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे आव्हान होते तर आता पाश्चात मेंटली गुलाम करणाऱ्या कंपन्यांचे आव्हान आमच्यासमोर आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत असंख्य समस्या झेलण्याची परंपरा असलेल्या या देशात युवा पिढी मात्र नैराश्याच्या गर्दीत सापडली आहे. अशा परिस्थितीत घरातील आजी आजोबांनी उगवत्या बाल पिढीच्या हाती पुस्तके देऊन त्यांना टेक्नॉलॉजीच्या गुलामगिरीतून बाहेर पाडण्याचे काम ते करू शकतात. जगातील महान लेखक, व्यावसायिक खेळाडू, अभिनेते, आर्टिस्ट हे रोजच्या पुस्तक वाचनातून घडले आहेत. आपली स्वप्न कोणत्याही परिस्थितीत मरू द्यायचे नसेल कोणत्याही परिस्थितीत आम्हाला संघर्ष करावा करायचा असेल तर डेली रीडर व्हा त्याला कृतीची जोड द्या असे कळकळीचे आव्हान त्यांनी केले.

जिल्हा वाचनालयाच्या वाचन संस्कृतीचा आदर्श कृतीतून देशभर गेला तर पुढचे पिढीचे भविष्य निश्चित उज्वल असेल असेही ते शेवटी म्हणाले. उपस्थित तरुणाई आणि सजग वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखक तांदळे यांनी उत्तरे देऊन सुसंवाद साधला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केले. परिचय शिल्पा रसाळ, सत्कार डॉ. राजा ठाकूर यांनी केला तर राहुल तांबोळी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जिल्हा वाचनालयातील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मन वढाय वढाय!

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




मित्रांना दिले असते जेवण्याचे निमंत्रण! पण त्यासाठी बाजारातून जे आणायचे त्याचे होते विस्मरण! मग घरात माजते रण! पण विस्मरण होण्याचे काय कारण? हे मनाचे अशक्तपण. ते मन दहा ठिकाणी एकाच वेळी करते भ्रमण. मग कशाकशाचे ठेवणार स्मरण ? राहावी आठवण, तर हवे मनाचे एकाग्रपण. त्याच्यावर कधी नसावे कशाचे दडपण. घालायचे त्याला विवेकाचे आवरण. कारण तसे फारच महत्वाचे इंद्रिय, हे मन !

पानाफुलांनी डवरलेला वृक्ष पाहिला, की छान वाटतं! मन प्रसन्न होतं. पण ही पानं फुलं जर का सुकली वाळली तर? फुटतील पुन्हा. होय, पण त्याचं मूळ अंकुर जमिनीत जिवंत असेल तर ना? वृक्षाचा मूळ अंकुरच नसला तर तो वृक्ष रम्य दिसेल कसा ? फुटायचीच नाही कधी पालवी त्याला. पालवी संपली म्हणून अंकुर नष्ट होत नाही; पण अंकुरच संपला, तर पानाफुलांचा बहर खुंटला! तसं या शरीराचं आहे. मन त्या वृक्षाच्या अंकुरासारखं मोलाचं आहे. मनच नसले तर इंद्रिय कामातून गेले! म्हणून जे करायचं त्यासाठी इंद्रियाचं साह्य घ्यायचचं; पण त्यात मनही घालायचं हे महत्त्वाचं आणि मन घालायचं तर ते तुमच्या ताब्यात ठेवायचं ! जागेवर ठेवाल मन तर कसं होईल विस्मरण ?

पांडुरंगाचं विस्मरण होऊ नये म्हणून भक्त आवरतो मन. होऊ देत नाही पांडुरंगाचं विस्मरण. त्यासाठी सदैव करतो नावाचा जप. ते नामच घोळवतो सदा ओठी आणि ध्यानी.

यासाठी नामस्मरण महत्त्वाचं. म्हणूनच पाठांतर मोलाचे. हे लहान वयातच करायचे. मोठेपणी कामाला यायचे. बुद्धीला चटकन आठवायचे.

ही एक जुनी कहाणी आहे. एकदा देवदत्त गेला एकटाच सासुरवाडीला. सासूबाईंनी त्याला जेवायचा आग्रह केला; पण देवदत्ताला जायचे होते. दुसरीकडे भोजनाला. म्हणून तो सासूबाईंना जेवणार नाही, म्हणाला. मग सासूबाईंनी काहीतरी खा म्हणून आग्रह केला. जेवणाचे नाव काढले आणि काही नाही खाल्ले, तर नाट लागून उपाशी राहावे लागेल, असे यापूर्वी घडले! हा सासूबाईंनी दाखला दिला. मग देवदत्ताला काहीतरी खावेच लागले; पण हे काहीतरी फारच मस्त होते. देवदत्ताला खूपच आवडते. गरमागरम आणि चवदार होते ! सासूबाईंनी पटकनही केले? असा कोणता बरे हा पदार्थ ? काय या पदार्थांचे नाव? त्याने सासुबाईंना विचारले. सासूबाई म्हणाल्या, त्याचे नाव धिरडे!

हे कसे करायचे ?

ज्वारीचे पीठ ताकात कालवायचे आणि तापलेल्या तव्यावर टाकायचे! हे होते कसे छान जाळीदार ! माझी मुलगी फारच छान करते हे धिरडे !

देवदत्त दुपारी घरी परतला. बायकोला म्हणाला, अगं सकाळी केलं होतं ना ते कर.'

काय केलं होतं आईनं ?

तुझ्या आइनं

देवदत्ताला धिरडे हे नाव आठवेना. तो एवढचं म्हणायचा. की ते कर. तुला फारच छान येत म्हणे ते.

देवदत्ताला झालं नावाचा विस्मरण. तो मग चिडला, संतापला. त्यानं घेतली काठी. मारली बायकोच्या पाठी. एकदा नव्हे, कित्येकदा. बायको रडकुंडीला आली व म्हणाली, किती मारलं? माझ्या पाठीचं धिरडं केलं!

आणि देवदत्ताला एकदम आठवलं! बस्स हेच केलं होतं सासुबाईनी ! देवदत्ताला वाईट वाटलं, पश्चात्ताप झाला. बायकोची त्यानं क्षमा मागितली. विस्मरणाचे धिरडे ! संसाराचे धिंडवडे ।।

**– किशोर गांधी**

# दुसरे बालपण-कला आनंद उत्सवाची तयारी; प्रेक्षकांसाठी ३ डी फोटो पॉईंटचे विशेष आकर्षण



दुसरे बालपण कार्यक्रमात डॉ. प्रकाश कांकरिया व डॉ. सुधाताई कांकरिया आदी.

नगर – येथील डॉ. कांकरिया यांचे मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित दुसरे बालपण-कला आनंद उत्सवात ज्येष्ठ नागरिकांच्या १२ नाटिकांसमवेत अनोखे आगळेवेगळे ३ डी फोटो पॉईंटचे विशेष आकर्षण निर्माण केले आहे. यामध्ये आजी आजोबा व नातवंडांना अनोखा ३ डी फोटो काढण्याची सुवर्णसंधी देण्यात येत आहे अशी माहिती संयोजिका डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.

सदर फोटो पॉईंटमध्ये ए आय चा वापर करून परंपरागत दगडी पडवी सोबत अंगणात गाई चरतांना, बाजूला मोती कुत्रा आणि आजी आजोबा नातवंडांना संस्कारक्षम गोष्टी सांगत आहेत असा ३ डी फोटो पॉईंट तयार करण्यात आला आहे. या अनोख्या व आगळ्या वेगळ्या फोटो पॉईंटमध्ये स्वत: आजी आजोबा तसेच नातवंडेही बसुन या फोटोचा एक भाग होऊ शकतात. सदार फोटो पॉईंट संकल्पना व डिझाइन नंदकुमार देशपांडे यांची असुन त्यांना रामदास सुलाखे यांचे सहकार्य लाभले आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले आहे.




२० मे रोजी सकाळी १० वाजता सावेडी येथील माऊली सभागृह येथे स्पर्धेचे उद्घाटन परीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच सतिष लोटके कोषाध्यक्ष अ.भा.म.नाटय परिषद मध्यवर्ती मुंबई यांच्या हस्ते होणार आहे. सदर स्पर्धेत १२ संस्थेने भाग घेतला असून या स्पर्धा पाहण्यासाठी प्रवेश विनामुल्य असुन सर्व वयोगटातील स्त्री पुरूष याचा लाभ घेऊ शकतात असे संयोजक कळवतात. पारितोषिक वितरण स्पर्धेनंतर लगेच होणार आहे. तसेच पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. राजेंद्र धामणे संस्थापक माऊली सेवा प्रतिष्ठान आणि नाटयलेखक, अध्यक्ष सदानंद भणगे साहित्यिक व नाटककार हे असून प्रसाद बेडेकर अध्यक्ष अ.भा.म.नाटय परिषद अहिल्यानगर उपनगर शाखा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पी डी कुलकर्णी, चंद्रकांत पालवे, सदाशिव मोहिते, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके, जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, हेमंत लोहगांवकर, आदिनाथ अन्नदाते, प्रिया सोनटक्के, रामदास केदार, दिपक शिरसुल हे परिश्रम घेत आहेत.

# घर-घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट

**कोरोना काळापासून सुरू असलेल्या निस्वार्थ सेवाकार्याचे कौतुक**

नगर – श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर-घर लंगर सेवेच्या तारकपूर येथील अन्न छत्रालयाला पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देत संस्थेच्या कार्याची पाहणी केली. कोरोना महामारीपासून सुरू असलेल्या या सेवाकार्याचा आढावा घेत त्यांनी संस्थेच्या निस्वार्थ सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, नगरसेवक मोहित पंजाबी, जीतू गंभीर, जय भोसले, लंगर सेवेचे जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, राजेंद्र कंत्रोड, मुन्नाशेठ जग्गी, राजू जग्गी, सतीश गंभीर, प्रशांत मुनोत, सुनील थोरात, राजा नारंग, गुलशन कंत्रोड आदी उपस्थित होते.



श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर-घर लंगर सेवेच्या तारकपूर येथील अन्न छत्रालयाला पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देत संस्थेच्या कार्याची पाहणी केली. यावेळी उपस्थित असलेले आ. संग्राम जगताप, आ. काशिनाथ दाते आदी.

तारकपूर येथील अन्न छत्रालयात दररोज गरजू, निराधार, कामगार, रुग्णांच्या नातेवाईकांसह अनेक गरजूंना मोफत भोजन उपलब्ध करून दिले जाते. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असताना घर-घर लंगर सेवेने हजारो नागरिकांपर्यंत अन्न पोहोचवून मानवतेचे दर्शन घडविले होते. आजही ही सेवा त्याच समर्पणाने सुरू असल्याने सामाजिक क्षेत्रात या उपक्रमाची विशेष ओळख निर्माण झाली आहे.

यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, घर-घर लंगर सेवेने कोरोना काळात भुकेल्यांच्या सेवेसाठी अपार परिश्रम घेतले. अनेक स्वयंसेवकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून गरजूंना अन्न पोहोचविले. संकटकाळात समाजाच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी मानवसेवा असून, श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानने हे कार्य सातत्याने जपले आहे. ही सेवा आजही तितक्याच ताकदीने सुरू असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य संस्था करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून घर-घर लंगर सेवा सातत्याने भुकेल्यांना अन्न, गरजू कुटुंबांना आधार आणि संकटग्रस्तांना मदत देत कार्यरत राहिली आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीतही संस्थेने पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात दिला. सामाजिक बांधिलकी जपत निरपेक्ष भावनेतून कार्य करणाऱ्या या उपक्रमामुळे अनेक गरजू नागरिकांना दिलासा मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत जनक आहुजा यांनी केले. त्यांनी घर-घर लंगर सेवेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. अन्न छत्रालयामार्फत दररोज शेकडो गरजूंना मोफत भोजन उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच सामाजिक सलोखा, मानवसेवा आणि परस्पर सहकार्य या मूल्यांच्या आधारे संस्था विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अन्न छत्रालयाची पाहणी करून स्वयंसेवकांशी संवाद साधला. अनेक गरजू नागरिकांसाठी सुरू असलेली ही सेवा समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.




ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अचीवर्स स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या १२ खेळाडूंचा सौ. शर्मिला पवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला.

# अचीवर्स स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या १२ खेळाडूंची ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

नगर – बारामती येथे नुकतेच पार पडलेल्या डॅन ग्रेडेशन परीक्षेत अहिल्यानगरच्या अचीवर्स स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या १२ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत ब्लॅक बेल्ट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. यशस्वी खेळाडूंना अक्ॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक आदित्य क्षीरसागर तसेच उपाध्यक्ष आशिष केदारी यांचे मार्गदर्शन लाभले.

या परीक्षेत शोदान (प्रथम ब्लॅक बेल्ट) उत्तीर्ण झालेले खेळाडू पुढीलप्रमाणे – इरा साळुंके, सान्वी साळुंके, श्रद्धा मूळे, रुद्रप्रताप मूळे, वेदांत जाधव, प्रणिती इघे, प्रतीक मोढवे, अथर्व बेद्रे, समर्थ सूर्यवंशी, जिया पटेल आणि कृतिशा बोर्डे. तसेच निदान (द्वितीय ब्लॅक बेल्ट) परीक्षेत ओंकार नर्हे यांनी यश संपादन केले. ही परीक्षा ट्रॅडिशनल शोतोकान ॲण्ड स्पोर्ट्स कराटे ऑर्गनायझेशन (टी. एस.एस.के.ओ. इंडिया) चे अध्यक्ष शिहान रवींद्र करळे तसेच टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी बारामती येथील शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. शर्मिला पवार यांच्या हस्ते यशस्वी खेळाडूंना ब्लॅक बेल्ट, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

# धनादेश न वटल्याप्रकरणी पतसंस्थेच्या कर्जदारास शिक्षा

नगर – महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था, भिंगार यांना कर्जाच्या हप्त्यापोटी दिलेला धनादेश वटला नाही म्हणून आरोपी मच्छिंद्र पंढरीनाथ कदम, रा. मु. भातोडी, पो. पारगाव, ता. जि. अहमदनगर यास डी. डी. कर्वे (१६ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी) यांनी २ महिन्यांचा साधा कारावास तथा रक्कम रू. ३,३०,००० दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. आरोपीने सदर दंडाचा भरणा न केल्यास त्याला मुख्य कारावासाचे व्यतिरिक्त १५ दिवसाचा साधा कारावास भोगावा लागेल अशी शिक्षा सुनावली.

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था, भिंगार, यांच्याकडून मच्छिंद्र पंढरीनाथ कदम, रा. मु. भातोडी, पो. पारगाव, ता. जि. अहमदनगर यांनी कर्ज रक्कम रू. १८,००,००० व्यवसाय वाढीसाठी घेतलेले होते व सदर कर्जाच्या थकबाकीपोटी १८/१०/२०१९ रोजी रू.२,००,००० भिंगार अर्बन को-ऑप. बँक भिंगार, शाखा माळीवाडा बँकेचा चेक नं. २६९३११ चा दिला होता. सदर धनादेश न वटल्यामुळे पतसंस्थेने मच्छिंद्र पंढरीनाथ कदम यांच्यावर एन. आय. ॲक्ट १३८ नुसार फौजदारी खटला दाखल केला होता. या खटल्यात फिर्यादी संस्थेचे अधिकारी राजेंद्र काशिनाथ पांढरे यांनी दिलेल्या साक्ष व पुराव्याच्या आधारे गुन्हा सिध्द झाल्याने मच्छिंद्र पंढरीनाथ कदम यांना दोषी ठरवून डी. डी. कर्वे यांनी मच्छिंद्र पंढरीनाथ कदम यांना २ महिने साधी कैद व ३,३०,००० रू. दंड ठोठावला असून त्या रकमेतून फिर्यादी संस्थेस ३,२७,००० रू. देण्याचा आदेश केलेला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आणखी १५ दिवस साधी कैद असा आदेश दिला. फिर्यादी संस्थेतर्फे ॲड. विनायक बाळासाहेब तोडमल, अहमदनगर यांनी काम पाहिले.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांची निवड

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांना निवडीचे पत्र प्रदान करताना आ. संग्राम जगताप. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, युवक शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, वैभव ढाकणे, नितीन घोडके, दीपक खेडकर, मयूर बलदोटा, जगु शिंदे, रोहन रासकर, बाबासाहेब हराळ आदी. (छाया – लहू दळवी)



केडगाव स्पोर्टस् अक्ॅडमीच्या वतीने एकदिवसीय बास्केटबॉल सराव शिबिराचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

# केडगाव स्पोर्टस् अकॅडमीच्या बास्केटबॉल सराव शिबिराला खेळाडूंचा प्रतिसाद

**भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार संभाजी कदम यांचे खेळाडूंना मार्गदर्शन**

नगर – केडगाव स्पोर्टस् अक्ॅडमीच्या वतीने एकदिवसीय बास्केटबॉल सराव शिबिराचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार व प्रशिक्षक तसेच भारतीय सैन्यात कार्यरत असलेले संभाजी कदम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

सायंकाळी पार पडलेल्या या शिबिराला नगर शहरातील बास्केटबॉल खेळाडू व क्रीडाप्रेमींनी प्रतिसाद दिला.

संभाजी कदम यांनी खेळाडूंना बास्केटबॉलमधील मूलभूत कौशल्ये, शारीरिक तंदुरुस्ती, खेळातील शिस्त आणि संघभावना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव कथन करत उपस्थित खेळाडूंना प्रेरणा दिली.

या कार्यक्रमास ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका सौ. कल्याणी फिरोदिया, संभाजी कदम अक्ॅडमीचे संस्थापक शरद नागणे, कोच गणेश नागणे व कोच धनंजय नखले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे नियोजन केडगाव स्पोर्टस् अक्ॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, खजिनदार सौ. रोहिणी कोतकर, प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि सौ. स्वाती बाराहाते यांनी केले. तसेच ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे प्रसाद जमदाडे, डॉ. देवेश कुमार बाराहाते, एबीसी क्रीडा मंडळाचे चंद्रशेखर म्हस्के, मुकुंद काशीद, सचिन अग्रवाल, ओमसिंग बायस, पियुष लुंकड, मार्शल पिल्ले, हर्षल शेलोत यांच्यासह अनेक क्रीडारसिक व खेळाडू उपस्थित होते.

भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असे अक्ॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांनी सांगितले.

# २० मे रोजी होणारा पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा स्थगित

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने २० मे रोजी आयोजित करण्यात आलेला पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा (ऑटोमोबाईल सेक्टर) महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे स्थगित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी नोंदणी केलेले उमेदवार, प्रशिक्षण संस्था, महाविद्यालये तसेच संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे.

# ‘शब्दगंध परिषद’ आयोजित राज्यस्तरीय स्व. अरुणकाका साहित्य नगरीचे २३ मे रोजी उद्घाटन

नगर – शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन स्व. अरुणकाका साहित्य नगरीचे उद्घाटन २३ मे रोजी सकाळी १० वा. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण व कृषी मंत्री दत्तात्रय विठ्ठल उर्फ दत्ता मामा भरणे यांच्या हस्ते हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंतराव डांगे, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, १६ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष संपत बारस्कर, १६ वे संमेलनाध्यक्ष डॉ.संजीवनीताई तडेगावकर, माजी संमेलनाध्यक्ष व माजी आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर व संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. संदीप सांगळे हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती नगरसेवक तथा स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे व शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी यांनी दिली.

उद्घाटनापूर्वी महापुरुषांना अभिवादन करून शाहिरी जलसा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. यामध्ये शाहीर कल्याण काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, डॉ. शेषराव पठाडे, प्रशांत सूर्यवंशी, दिगंबर गोंधळी, हौसीनाथ बोर्डे व शब्दगंधची टीम सहभागी होणार आहे. दुपारी २ वाजता आधुनिक साहित्यातील स्त्री जीवनाचे चित्रण या विषयावर निलिमाताई बंडेलु यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यामध्ये संगमनेर येथील निलीमा क्षत्रिय, मॅक्सवुमन मुंबईच्या संपादिका प्रियदर्शनी हिंगे सहभागी होणार आहेत.

दुपारी ३ ते ५ कवयित्री माधुरीताई मरकड यांच्या अध्यक्षतेखाली खुले काव्य संमेलन (कवी कट्टा) होणार असून यावेळी दंगलकार नितीन चंदनशिवे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, प्राचार्य चंद्रकांत भोसले, प्रा.शशिकांत शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दुपारी ५ वाजता बदलते ग्रामीण जीवन आणि ग्राम संस्कृती या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजय कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार असून यामध्ये प्राचार्य डॉ.संजय नगरकर, संपादक सुधीर लंके, साथी शिवाजी नाईकवाडी, प्रा.डॉ.गणेश मोहिते सहभागी होणार आहेत.

सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे चे कोषाध्यक्ष, गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या अध्यक्षतेखाली गझल काव्य संमेलन होणार असून यामध्ये माधव सावंत, हनुमंत येवले, संजय पठाडे, रज्जाक शेख, साहेबराव घुले, सरिता कलडोणे, प्रशांत वाघ, विक्रम कांबळे, राम गायकवाड, बबन धुमाळ, इकबाल काकर, बाळासाहेब गिरी, अरुण कटारिया,

**तयारी पूर्ण; संमेलनात उपस्थित राहावे : स्वागतध्यक्ष सुरेश बनसोडे**



धनंजय तांदळे, सुहास घुमरे, हुमायून आतार, अजय त्रिभुवन, कुणाल शिरोडे, राजू आठवले, अंजली दीक्षित सहभागी होणार आहेत.

रविवारी सकाळी ९/३० वा.कथा व काव्य लेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रा.डॉ.संजय पाईकराव, संदीप रोहकले यांच्या हस्ते होणार असून प्राचार्य डॉ. अशोकराव ढगे, प्राचार्य बाळासाहेब सागडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलूलकर, संपादक प्रभाकर सूर्यवंशी यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन होणार आहेत. प्रारब्ध – सौ.एस.एम. मिर्झा, अंतरी – सुरेखा घोलप, माणसं असे अन तसेही – बाळासाहेब देशमुख, निशब्द भावना – विनय पिंपरकर इत्यादी पुस्तकाचे प्रकाशन यावेळी होणार आहे.

सकाळी १०/३० वा.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य कविवर्य प्रकाश होळकर यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रिताचे काव्य संमेलन होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आठव्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष कविवर्य प्रकाश घोडके, हनुमंत चांदगुडे उपस्थित राहणार आहेत. या काव्य संमेलनात बाळ पाटील, चंद्रकांत कर्डक, भास्कर निर्मळ, दशरथ शिंदे, शारदा घोडके, डॉ.कैलास दौंड, अर्जुन देशमुख, शुभांगी राऊतमारे, लक्ष्मण खेडकर, वर्षा चौबे, डॉ.स्वाती पाटील, वसंत मुरदारे, अशोक निंबाळकर, माधुरी चौधरी, डॉ.प्रवीण जाधव, प्रवीण घुले, संदीप राठोड, नागेश शेलार, स्नेहल डाडर, नवनाथ केंदळे, अनिलकुमार होळकर, रिता जाधव इत्यादी महाराष्ट्रातील कवी यामध्ये सहभागी होणार आहेत.

दुपारी २ वा. असा मी घडलो... हे चर्चासत्र बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यामध्ये पद्मश्री राहीबाई पोपेरे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी रेवणनाथ कानडे, साई एशियन हॉस्पिटलचे संचालक डॉ.सचिन पांडुळे इत्यादी सहभागी होणार आहेत.

दुपारी तीन वाजता ग्रंथविक्रेत्यामुळे वाचन चळवळीला पाठबळ मिळते का या विषयावर चर्चासत्र होणार असून यामध्ये लेखक प्रकाशक वाचक साहित्यिक ग्रंथ विक्रेते सहभागी होणार आहेत.

रविवारी दुपारी ४ वा.१७ व्या शब्दगंध संमेलनाचे पारितोषिक वितरण व समारोप पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार असून यावेळी माजी आमदार कविवर्य लहू कानडे, पाथर्डी नगर परिषदेचे नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, सीएसआडीचे प्राचार्य डॉ. सुरेश पठारे, प्राचार्य शिवाजीराव देवढे, बापूसाहेब भोसले, कॉ. बाबा आरगडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनात प्रा.डॉ.गणी पटेल, छत्रपती संभाजीनगर व आयु. अशोकराव गायकवाड, अहिल्यानगर यांना शब्दगंध जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून मातोश्री यमुनाबाई पांडुळे स्मृती पुरस्कार अ‍ॅड. रंजनाताई गवांदे यांना देण्यात येणार आहे.तसेच विविध साहित्य कृतींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.आत्तापर्यंत झालेल्या शब्दगंध संमेलनाध्यक्षांची भाषणे शब्दसंचित या सुनील गोसावी संपादित ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनातील सर्व कार्यक्रमांसाठी साहित्यिक व साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सुरेश बनसोडे, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, संयोजन समिती सदस्य संजय खामकर, परिमल निकम, जयंत गायकवाड, भगवान राऊत, डॉ.अशोक कानडे, भारत गाडेकर, जयश्री झरेकर, प्रा.डॉ. तुकाराम गोंदकर, राजेंद्र फंड, प्रा.डॉ. अनिल गर्जे, स्वाती ठुबे, बबनराव गिरी, सुभाष सोनवणे, हर्षल आगळे, मकरंद घोडके, शर्मिला गोसावी, राजेंद्र पवार, रवींद्र दानापुरे, प्रशांत सूर्यवंशी व राजेंद्र चोभे यांनी केले आहे.



विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचा रक्तदानाचा गौरव पुरस्काराने विशेष सन्मान करण्यात आला.

# विहिंपचे मंदिर अर्चक पुरोहित आयामाचा ‘रक्तदानाचा गौरव पुरस्कारा’ने सन्मान

नगर – अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमीच्या आंदोलनात शहीद झालेले रामकुमार कोठारी व शरदकुमार कोठारी बंधूंच्या स्मरणार्थ व विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे यांच्या जन्मदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनकल्याण समिती संचलित ’जनकल्याण रक्तकेंद्र, अहिल्यानगर’ यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम या संस्थेला रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट आयोजन करून ’रक्तदान चळवळीत’ सहकार्य केल्याबद्दल हा बहुमान मिळाला आहे.

रक्तदान शिबीर संयोजक गौरव पुरस्कार (सन्मानचिन्ह) देऊन गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह जनकल्याण समितीचे माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र साताळकर यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, मराठा चैंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी, संचालक आदित्य चांदेकर, पुरस्कार स्वीकारताना विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, जिल्हा सह मंत्री राजेंद्र चुंबळकर, गायत्री परिवाराचे काशीनाथ मोडे, सुरेंद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

विहिंपचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर म्हणाले, रक्तदान हे महान कार्य आहे. रक्तदानाच्या महान कार्याबद्दल गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आले. ही अत्यंत आनंदाची बाब आहे. विश्व हिंदू परिषदेचे सामाजिक कार्यात पुरस्काराने आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. हा पुरस्कार संस्थेच्या सर्व पाठीराख्यांना, कार्यकर्त्यांना आणि रक्तदात्यांना समर्पित केला आहे. तुमच्या साथीशिवाय हे शक्य नव्हते. हेच प्रेम आणि सहकार्य पुढेही कायम राहो, हीच अपेक्षा आहे.

# जेसीएएफ जीवन गौरव पुरस्काराने सीए रमेश फिरोदिया यांचा सन्मान



जैन चार्टर्ड अकाउंटंट फेडरेशनचा (जेसीएएफ) जीवन गौरव पुरस्कार नगरमधील उद्योजक तथा सीए रमेश फिरोदिया यांना प्रदान करण्यात आला.

नगर – जैन चार्टर्ड अकाउंटंट फेडरेशनचा (जेसीएएफ) नगर–मधील उद्योजक तथा सीए रमेश फिरोदिया यांना जैन सीए जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सी.ए. रमेश फिरोदिया यांना मुंबई येथे या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जेसीएएफचे चेअरमन सीए एम.जी. भंडारी, अध्यक्ष सीए शांतीलाल कोचर, उपाध्यक्ष सीए प्रदीप कापडिया, सीए अमृत पोरवाल, सीए जयेश काला, सीए पुनित मेहता, सीए विद्युत जैन आदींसह देशभरातील जैन सीए उपस्थित होते.

संगमनेर तालुक्यातील साकूर हे फिरोदिया यांचे मूळ गाव. जीवनात प्रगती करायची तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी लहान वयात उमजले. त्यामुळे त्यांनी बी.कॉम. ऑनर्स पदवी घेतल्यानंतर सी.ए.अभ्यासक्रमास प्रवेश घेवून अतिशय कठीण अशी ही पदवी मिळवली. १९७० पासून ते एक कुशल सनदी लेखापाल म्हणून प्रॅक्टिस करीत आहेत. आपल्या व्यवसायात यशोशिखरावर पोहचतानाच फिरोदिया यांनी कायम सामाजिक बांधिलकी जपण्यावर भर दिला आहे. त्यांनी आपल्या साकुर गावात शिक्षणाची गंगोत्री आणण्यासाठी महाविद्यालय सुरु केले. साकूर येथील रमेश फिरोदिया आर्टस, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स सीनियर कॉलेज संस्थेचे ते चेअरमन असून या संस्थेत आजमितीस तब्बल ८०० मुले चांगले शिक्षण घेत आहेत. मुंबईस्थित रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्टचे ते विश्वस्त आहेत. नगर जिल्ह्यात दर्जेदार आर्कीटेक्चर महाविद्यालयाची उणीव भासत होती. हे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबईला जावे लागायचे. हीच गोष्ट लक्षात घेऊन फिरोदिया यांनी नगर – सोलापूर रस्त्यावर वाळूंज शिवारात २०१७ मध्ये प्रशस्त अशा आर्कीटेक्चर महाविद्यालयाची स्थापना केली. नगरच्या आय.एम.एस. संस्थेतील सीडसी संस्थेच्या उभारणीत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. नगर शहरातील शिशु संगोपन संस्थेच्या शाळेची इमारत नव्याने बांधून देत त्यांनी सविता रमेश फिरोदिया प्रशाला हे नाव दिले. पाली राजस्थान येथील श्री रुपमुनि रजत गुरु सेवा समिती तसेच चितोडगड आदेश्वर पार्श्व सेवा ट्रस्टचे विश्वस्त म्हणूनही ते भरीव योगदान देत आहेत.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात त्यांनी नेहमीच सक्रिय योगदान दिले आहे. नगरमधील पांजरापोळ गोरक्षण संस्थेचे ते विश्वस्त व उपाध्यक्ष आहेत. याशिवाय नाशिक येथील मातोश्री वृध्दाश्रमाचेही ते विश्वस्त आहेत. धार्मिक कार्यातही त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो. नगरचे धार्मिक परीक्षा बोर्ड व मुंबईतील महावीर एज्युकेशन वसतीगृहाचे तसेच मुंबईतील आत्मा आनंद संघाचे ते विश्वस्त असून नगरमधील ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानामुळे फिरोदिया यांची अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सच्या विश्वस्तपदीही निवड झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेवून परळीतील (जि.बीड) मारवाडी युवा मंचने स्व.सुवालाल वाकेकर (ललवाणी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ फिरोदिया यांना राज्यस्तरीय ’समाज भूषण’ पुरस्काराने गौरविले आहे. जितो अहमदनगरचा ’जितो जीवन गौरव पुरस्कार’ त्यांना मिळाला आहे.

नगरमध्ये सी. ए. असोसिएशन भवनात प्रशस्त असे ऑडिटेरियम त्यांनी साकारले आहे. कोल्हार येथील कैवल्यधाम येथेही ते सक्रिय मदत करीत असतात. विविध क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदान लक्षात घेऊन त्यांना जेसीएएफने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे.

# जितो अहिल्यानगरच्यावतीने २३ मे रोजी रोजगार मेळावा

**पात्र उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीद्वारे नोकरीची संधी**

JITO AHILYANAGAR

नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या जितो जॉब्स उपक्रम अंतर्गत २३ मे रोजी देशपातळीवर जितो नॅशनल जॉब फेअर २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत जितो अहिल्यानगरच्यावतीने नगरमध्येही रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे. स्टेशन रोडवरील नेवासकर पेट्रोल पंपाशेजारील अर्थ बँक्रेट (४ था मजला) जीसीएम टॉवर्स येथे सकाळी ११ ते दुपारी ४ यावेळेत हा मेळावा होईल. पात्र उमेदवारांना थेट मुलाखतीद्वारे नोकरीची संधी यात मिळणार आहे, अशी माहिती जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत यांनी दिली.

जितो अहिल्यानगरचे चीफ सेक्रेटरी तुषार कर्नावट व जितो जॉब्सचे कन्व्हेनर प्रशांत बोगावत यांनी सांगितले की, देशातील बेरोजगारीची समस्या लक्षात घेऊन जितोच्यावतीने सातत्याने सर्व समाजातील युवक युवतींसाठी रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या जातात. नामांकित कंपन्या आणि पात्र उमेदवार यांना एका व्यासपीठावर आणून रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जातो. या रोजगार मेळाव्यात मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, फायनान्स, बँकिंग, मार्केटिंग, प्रशासन, तांत्रिक क्षेत्र तसेच इतर विविध उद्योगांमधील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून पात्र उमेदवारांची थेट मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. सर्व रोजगार इच्छुक, फ्रेशर्स, इंटर्नशिप इच्छुक, अनुभवी प्रोफेशनल्स तसेच रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या उमेदवारांना जितो जॉब्स पोर्टलवर नोंदणी करून या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या विविध कंपन्यांकडून सेल्स हेड, फायनान्स हेड, बँकिंग व फायनान्स, सेल्स व मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, फील्ड व आउटडोअर मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, अकाउंट्स व बिलिंग एक्झिक्युटिव्ह, फ्रंट डेस्क व प्रशासकीय कर्मचारी, ग्राफिक डिझायनर, डिस्पॅच ऑफिसर, वर्कशॉप व स्पेअर पार्ट्स एक्झिक्युटिव्ह, इन्शुरन्स व बॅक ऑफिस कर्मचारी, क्वालिटी अ‍ॅश्युरन्स कर्मचारी, एचआर एक्झिक्युटिव्ह, कस्टमर रिलेशनशिप मॅनेजर, डेटा ऑपरेटर, इंडस्ट्री सेफ्टी सुपरवायझर, सीएनसी सुपरवायझर, मेंटेनन्स फिटर व हायड्रॉलिक टेक्निशियन, इलेक्ट्रिशियन व वेल्डर, मशीन ऑपरेटर, फाउंड्री सुपरवायझर, सेल्स मॅनेजर व सुपरवायझर अशा विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय दररोज नवीन पदांची माहिती पोर्टलवर अपलोड केली जात असून विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी www.jitojobs.org या पोर्टलवर बायोडाटा अपलोड करून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ८६९८६५२७२७.

# ‘बोल फाउंडेशन’ समाजसेवा पुरस्कार २०२६ ने सन्मानित



लेविन भोसले यांच्या हस्ते ‘बोल फाउंडेशन’ ला समाजसेवा पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले.

श्रीरामपूर – अहिल्यानगर येथील प्रकाश किरण प्रतिष्ठानद्वारे ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाउंडेशन भिंगार, अहिल्यानगर या प्रतिष्ठानला समाजसेवा पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले. प्रकाश किरण प्रतिष्ठानचे अध्यक्ष व मराठी साहित्यिक लेविन भोसले यांच्या हस्ते बोल फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे व अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांना शाल व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

बोल फाउंडेशन ही एक सामाजिक तळागाळातील वंचित, दुर्बल, दुर्लक्षित व गरजवंतांसाठी भिंगार, अहिल्यानगर येथे कार्य करीत आहे. या संस्थेला यंदाच्या समाजसेवा पुरस्कार २०२६ ने प्रकाश किरण प्रतिष्ठान द्वारे गौरवण्यात आले.

बोल फाउंडेशन इ.स. २०१० पासून विविध समाजाभिमुख उपक्रमाद्वारे कर्यरत आहे. समाजातील जात, धर्म, पंथ, वर्ण व प्रदेश आणि भाषा यांच्या पलीकडे जाऊन मानव धर्म जपण्याचा संस्था सातत्याने प्रयत्न करीत आहे, असे लेविन भोसले यांनी बोल फाउंडेशनच्या कार्याची प्रशंसा केली, तसेच बोल फाउंडेशनचे संस्थापक गौरव पाटोळे व सह संस्थापक अमित पाटोळे यांच्या अथक कार्या बद्दल प्रशंसा केली.

# जायंटस् वेलफेअर फाउंडेशनच्या द्वितीय कौन्सिल मीटिंगला प्रतिसाद

**सहेली सिम्पोझियममधून महिला सक्षमीकरण, बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश, राज्यभरातील प्रतिनिधींची उपस्थिती; सामाजिक कार्याचा आढावा**



जायंटस् वेलफेअर फाउंडेशन फेडरेशन 2B ची द्वितीय कौन्सिल मीटिंग व सहेली सिम्पोझियम शहरात उत्साहात पार पडले. फेडरेशन कौन्सिलच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह राज्यभरातील महिला प्रतिनिधींनी उपस्थिती लावत सामाजिक क्षेत्रात करण्यात आलेल्या कार्याचा आढावा घेतला.

नगर – जायंटस् वेलफेअर फाउंडेशन फेडरेशन 2B ची द्वितीय कौन्सिल मीटिंग व सहेली सिम्पोझियम शहरात उत्साहात पार पडले. फेडरेशन कौन्सिलच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह राज्यभरातील महिला प्रतिनिधींनी उपस्थिती लावत सामाजिक क्षेत्रात करण्यात आलेल्या कार्याचा आढावा घेतला. महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी, बचतीचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैली या विविध विषयांवर या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व जायंटस् प्रार्थनेने झाली. याप्रसंगी फेडरेशनचे अध्यक्ष जुगलकिशोर हरकुट, फेडरेशन सचिव सन्मती जैन, स्पेशल कमिटी मेंबर विनोद शेवतेकर, जगन्नाथ साळुंके, सहेली सिम्पोझियमच्या इन्चार्ज श्रीमती सूर्यमाला मालानी, संजय गुगळे, सचिव सन्मती जैन, अनघा अंबेकर, रंजना भावसार, रत्नाकर महाजन, सुरेखा अग्रवाल, सरिता मालानी, शीतल अग्रवाल, पायल गांधी, भावना मोहित कटारिया, नरेश गुप्ता, बलवंत शिंदे, अहिल्यानगर जायंटस् ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, प्रशांत मालाणी, संजय सराफ, अनघा आंबेकर, रंजना भावसार, ऑफिसर बलवंत शिंदे, अभय मुथा, डॉ. विनय शहा आदींसह फेडरेशन कौन्सिलचे पदाधिकारी व महिला प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रास्ताविकात बोलताना अहिल्यानगर जायंटस् ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकासाची संधी पोहोचविण्याच्या उद्देशाने संस्थेचे कार्य सुरू असून, सक्षम भारत घडविण्यासाठी लहान मुलांना चांगले शिक्षण, संस्कार आणि सर्वांगिण जडणघडण मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

संजय गुगळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, जायंटस् वेलफेअर फाउंडेशन ही सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी पहिली भारतीय संस्था असून, या संस्थेमुळे महिलांना मोठ्या प्रमाणात सामाजिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली आहे. भारतात निर्माण झालेल्या या संस्थेने परदेशातही आपले नेटवर्क उभारले आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. शहरात अनेक दिग्गज मंडळींनी या संस्थेची धुरा यशस्वीपणे सांभाळली असून, आपण गेली ४० वर्षे जायंटस् मध्ये कार्यरत असल्याचे सांगत ही सामाजिक चळवळ अधिक व्यापक होत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सहेली सिम्पोझियमच्या इन्चार्ज सूर्यमाला मालाणी यांनी महिलांच्या योगदानाचा गौरव करताना सांगितले की, महिलांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या उत्तमपणे सांभाळत सामाजिक कार्यातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. सहेली सिम्पोझियमच्या माध्यमातून देशभरातील महिला एकत्र येऊन सामाजिक व सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण करतात आणि सामाजिक चळवळीला नवी ऊर्जा देतात. महिलांकडून बचतीची सवय शिकण्यासारखी असून, आर्थिक प्रगतीसोबत बचतही तितकीच महत्त्वाची आहे. संकटकाळात हीच बचत उपयोगी पडते, असे सांगत त्यांनी देशासमोरील विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर बचतीचा संदेश दिला.

निसर्गोपचार तज्ञ हेमा सेलोत यांनी आहार, व्यायाम आणि निरोगी आरोग्य या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी स्वतःच्या परिस्थितीचा स्वीकार करून जीवनातील नकारात्मकता दूर करण्याचे आवाहन केले. दिवसाची सुरुवात सकारात्मकतेने आणि आरोग्यदायी सवयींनी करण्याचा सल्ला देत त्यांनी आहारामध्ये रिफाइंड केलेल्या पदार्थांचे सेवन टाळण्याचा संदेश दिला. योग्य आहारामुळे अनेक आजार टाळता येतात. सिझनल फळे, नैसर्गिक रंगांची फळे व भाज्यांचा आहारात समावेश करण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. कृत्रिम रंगांचा वापर टाळून नैसर्गिक आहारशैली आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात महिलांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगत आणली. महिलांनी विविध कला सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. याशिवाय महिलांसाठी बौद्धिक व मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमधील विजेत्या महिलांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. स्पेशल कमिटी मेंबर्सनी उपस्थितांशी संवाद साधत विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात फेडरेशन सचिव सन्मती जैन यांनी संस्थेच्या सामाजिक बांधिलकीवर प्रकाश टाकत आगामी काळात अधिक व्यापक स्तरावर समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गांधी व विद्या तन्वर यांनी केले. सचिव अमित मुनोत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जायंटस् ग्रुपचे राजेंद्र कटारिया, अनिल गांधी, अमित धोका, विद्या तन्वर, नूतन गुगळे, पूजा पातूरकर, शीतल कदम, अमित मुनोत आणि दीपक मुथा यांनी विशेष परिश्रम घेतले.

### द्वितीय कौन्सिल मीटिंगमध्ये सामाजिक कार्याचा आढावा

दुसऱ्या सत्रात जायंटस् वेलफेअर फाउंडेशन 2B ची द्वितीय कौन्सिल मीटिंग फेडरेशन अध्यक्ष जुगलकिशोर हरकुट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून फेडरेशनचे संचालक या बैठकीस उपस्थित होते. यावेळी त्यांनी आपल्या कार्याचा आढावा घेत विविध सामाजिक उपक्रमांची माहिती सादर केली. फेडरेशन डायरेक्टर्सनी समाजोपयोगी नवनवीन उपक्रम राबविणे, आपल्या कार्यक्षेत्रात नवीन ग्रुप स्थापन करणे तसेच सदस्यसंख्या वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या. सामाजिक चळवळीचा विस्तार करत अधिकाधिक लोकांना या उपक्रमांशी जोडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# उभे केले कोट्यवधींचे साम्राज्य

अचिव्हर



‘इच्छा तिथे मार्ग’ ही म्हण प्रत्यक्षात उतरवणारी प्रेरणादायी कथा तमिळनाडूतील बसवराज एस यांची आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून प्रवास सुरू करून त्यांनी केवळ एक हजार रुपयांपासून व्यवसायाची सुरुवात केली आणि आज कोट्यवधींचा व्यवसाय उभा केला आहे.

बसवराज यांनी २०२२ साली ‘राफ्टर’ नावाचा स्टार्टअप सुरू केला. हा स्टार्टअप पर्यावरणपूरक गिफ्टिंग प्रोडक्ट्स तयार करतो. बांबूपासून बनवलेल्या बाटल्या, तांदळाच्या भुश्यापासून तयार केलेले मग यांसारख्या उत्पादनांना मोठी मागणी आहे. अनेक कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना भेटवस्तू म्हणून अशी उत्पादने देतात. बसवराज आधी नोकरी करत होते; मात्र एके दिवशी त्यांची नोकरी गेली. ही गोष्ट त्यांनी वडिलांना सांगितली असता वडील नाराज झाले आणि त्यांनी बसवराज यांना केवळ एक हजार रुपये देऊन घराबाहेर पाठवले.

हातात फक्त १००० रुपये आणि डोळ्यांत मोठं स्वप्न घेऊन बसवराज बेंगळुरूला पोहोचले. त्यांनी ठरवलं की, काहीतरी मोठं करूनच परत घरी जायचं.

बेंगळुरूमध्ये त्यांनी आपल्या थोड्याफार बचतीच्या जोरावर ‘कांबर प्रॉडक्ट्स अँड सर्व्हिसेस’ नावाची कंपनी सुरू केली. ही कंपनी युनिफॉर्म, सेफ्टी गिअर आणि ऑफिस साहित्य पुरवण्याचे काम करत होती; मात्र याच काळात कोरोनाचा फटका बसला. लॉकडाऊनमुळे व्यवसायावर मोठा परिणाम झाला. अनेक अडचणींचा सामना करावा लागला; पण या संकटातूनच त्यांना नवीन संधी दिसली.

कोरोना काळातच बसवराज यांना गिफ्टिंग प्रोडक्ट्सच्या व्यवसायाची कल्पना सुचली. त्यानंतर त्यांनी ‘राफ्टर’ कंपनीची स्थापना केली. ही कंपनी पर्यावरणपूरक गिफ्ट्स तयार करते आणि मोठ्या कंपन्यांना पुरवते.

आज ‘राफ्टर’’कडे ५००० हून अधिक उत्पादने आहेत आणि कंपनीची वार्षिक उलाढाल १ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

बसवराज यांचा प्रवास नोकरी जाणे, आर्थिक अडचणी, लॉकडाऊनचा फटका अशा अनेक अडचणींनी भरलेला होता; परंतु त्यांनी कधीही हार मानली नाही. जिद्द, मेहनत आणि योग्य वेळी घेतलेले निर्णय यांच्या जोरावर त्यांनी आपले स्वप्न साकार केले.




## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# पर्यटकांना हवेत होम स्टे

भटकंती

मध्य प्रदेश पर्यटन विभागाने पर्यटनाच्या क्षेत्रात एक नवा आणि यशस्वी प्रयोग केला असून, रीवा जिल्ह्याने आता जगभरातील पर्यटकांना भुरळ घातली आहे. अलिशान हॉटेल्स आणि चकचकीत दुनिया सोडून आता देश-विदेशातील पाहुणे थेट गावांकडे वळत आहेत. रीवाच्या पूर्वा धबधब्यापाशी सुरू झालेले ‘होम स्टे’ पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. रीवामधील ग्रामीण पर्यटनाने एका नव्या उंचीला गवसणी घातली आहे. निसर्गाच्या कुशीत राहण्याची ओढ पर्यटकांना इथपर्यंत खेचून आणत आहे.

रीवाच्या पर्यटन स्थळांना चालना देण्यासाठी ‘ग्राम सुधार समिती’ आणि पर्यटन विभागाने सेमरिया विधानसभा क्षेत्रातील प्रसिद्ध पूर्वा जलप्रपाताजवळ १६ ठिकाणी ‘होम स्टे’ची निर्मिती केली आहे.

ग्रामीण अनुभव: येथे येणाऱ्या पर्यटकांना केवळ राहण्याची सोयच नाही, तर अस्सल ग्रामीण जीवन जगण्याची संधी मिळत आहे.

देशी जेवण: चुलीवरचे जेवण आणि रीवाचा प्रसिद्ध ‘बघेली’ स्वाद चाखण्यासाठी पर्यटक येथे आवर्जून गर्दी करत आहेत.

बैलगाडीची सफारी आणि निसर्गाची ओढ

प्रदूषण आणि शहराच्या गोंगाटापासून दूर राहण्यासाठी पर्यटक आता लक्झरी गाड्या सोडून बैलगाडीची सैर करत आहेत. बसामन मामा समाधी स्थळ दहा हजार गायी असलेली महाकाय गोशाळा आणि पूर्वा वॉटरफॉल पाहण्यासाठी येणारे पर्यटक आता हॉटेलऐवजी ‘होम स्टे’मध्ये राहण्याला पसंती देत आहेत. नुकताच केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी या क्षेत्राचा दौरा करून नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन दिले होते. त्याचा सकारात्मक परिणाम आता पर्यटनावरही दिसत आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळाली बळकटी


हा ‘होम स्टे’मॉडेल केवळ पर्यटकांना आनंद देत नाहीये, तर ग्रामीण भागातील लोकांच्या हाताला रोजगारही मिळवून देत आहे. स्थानिक नागरिक आपली लोककला आणि संस्कृती पर्यटकांसमोर सादर करत आहेत. गावकऱ्यांनी स्वतःच्या घरांना ‘होम स्टे’मध्ये रूपांतरित केल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचे साधन वाढले आहे.



# दहावीनंतर करिअरचे पर्याय

करिअर गाइडन्स

दहावीच्या बोर्डाची परीक्षा झाल्यानंतर अनेक विद्यार्थी आणि पालकांच्या मनात प्रश्न असतो, की आता काय करायचे? सर्वच विद्यार्थी दीर्घकालीन अभ्यासक्रम आणि महागड्या कॉलेजचा खर्च उचलू शकत नाहीत; परंतु याचा अर्थ असा नाही. त्यांच्यासाठी चांगल्या करियरचे दरवाजे बंद होतील. आजच्या काळात अनेक असे टेक्निकल आणि प्रोफेशनल कोर्सेस उपलब्ध आहेत. त्यामुळे दहावीनंतर चांगले करियर करता येते आणि लागलीच नोकरी करता येते. चला तर पाहूयात दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणते कोर्स फायद्याचे असतात. हे टेक्निकल कोर्स भविष्यात नक्कीच फायद्याचे ठरतात.



### आयटीआय

टेक्निकल कामांमध्ये रस असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयटीआय एक चांगला पर्याय मानला जातो. हा कोर्स सर्वसाधारणपणे १ ते २ वर्षात पूर्ण होतो. यात इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, प्लंबर, मॅकेनिक आणि कॉम्प्युटर ऑपरेटर अशा अनेक शाखांचा समावेश असतो. आयटीआय केल्यानंतर रेल्वे, फॅक्टरी, प्रायव्हेट कंपन्या आणि सरकारी विभागात नोकऱ्यांची संधी मिळू शकते. सुरुवातीला १५ ते ३० हजार रुपये मासिक वेतन मिळते. नंतर अनुभवासोबत पगारात वाढ होत जाते.

### पॉलिटेक्निक डिप्लोमा

ज्यांना इंजीनिअरिंग सेक्टरमध्ये लवकर पाऊल ठेवायचे असेल, त्यांच्यासाठी पॉलिटेक्निक डिप्लोमा हा चांगला ऑप्शन आहे. हा कोर्स तीन वर्षांचा असून यात मॅकेनिकल सिव्हील, इलेक्ट्रीकल, कॉम्प्युटर आणि इलेक्ट्रॉनिक्ससारख्या अनेक शाखा असताता. पॉलिटेक्निक केल्यानंतर उमेदवारांना कन्स्ट्रक्टेड कंपनी, मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स आणि सरकारी डिपार्टमेंटमध्ये नोकरीची संधी मिळते. याशिवाय लॅटरल एंट्रीच्या माध्यमातून इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षात प्रवेशापासून पुढचा अभ्यास करता येतो.

### डिजिटल मार्केटिंग


डिजिटलच्या युगात आता डिजिटल मार्केटिंग वेगाने वाढणारे करियअर ऑप्शन बनले आहे. ३ ते १२ महिन्याच्या आत पूर्ण होणारा हा कोर्स ‘एसईओ’, ‘सोशल मीडिया’, ऑनलाईन ॲडव्हर्टाईजमेंट आणि कंटेन्ट प्रमोशन सारखी स्किल्स शिकवली जातात. या सेक्टरमध्ये नोकरीसोबत फ्रिलान्स आणि स्वत:चे काम सुरू करण्याची संधी देखील मिळते. यात सुरुवातीचे उत्पन्न २० ते ४० हजार रुपयांपर्यंत असू शकते.

### कॉम्प्युटर हार्डवेअर आणि नेटवर्किंग

आज प्रत्येक इन्स्टिट्यूटमध्ये कॉम्प्युटरचा वापर केला जात आहे. त्यामुळे हार्डवेअर आणि नेटवर्किंगची माहिती असणाऱ्यांची मागणी जास्त वाढत आहे. हा कोर्स ६ महिन्यांपासून ते १ वर्षांत पूर्ण होऊ शकते. तर याच कोर्सनंतर सर्व्हीस सेंटर, प्रायव्हेट कंपन्यात काम किंवा स्वत:चा रिपेयरिंगचा व्यवसाय सुरू करता येतो. या कोर्समध्ये सुरुवातीची कमाई १५ ते ३० रुपये महिना असू शकते.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्सॲपला एक्सचॅटचा पर्याय





एलन मस्क यांच्या मालकीच्या एक्स कंपनीने एक नवीन स्वतंत्र मेसेजिंग ॲप ‘एक्सचॅट’ बाजारात सादर केले आहे. सध्या हे ॲप केवळ आयओएस वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असून याच्या माध्यमातून यूजर्सना त्यांच्या एक्स कॉन्टॅक्ट्ससोबत चॅटिंग, कॉलिंग आणि फाइल शेअरिंग करता येणार आहे. मस्क यांचा ‘ऑल-इन-वन’ ॲप तयार करण्याचा दीर्घकालीन विचार असतानाच त्यांनी स्वतंत्र मेसेजिंग प्लॅटफॉर्मच्या रूपात हा नवीन प्रयोग केला आहे. त्यामुळे या ॲपकडे टेक जगताचे विशेष लक्ष लागले आहे. ‘एक्सचॅट’ मध्ये वापरकर्त्यांना अनेक आधुनिक आणि उपयुक्त सुविधा देण्यात आल्या आहेत. यामध्ये ऑडिओ आणि व्हिडिओ कॉलिंग, टेक्स्ट मेसेजिंग, ग्रुप चॅट आणि फाइल शेअरिंगचा समावेश आहे.

याशिवाय, गोपनीयतेवर विशेष भर देत ‘डिसॲपियरिंग मेसेज’, ‘मेसेज एडिट’ आणि ‘डिलिट’ करण्याचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. स्क्रीनशॉट ब्लॉक करण्याचे फीचरही या ॲपमध्ये देण्यात आले आहे. ते यूजर्सच्या प्रायव्हसीसाठी महत्त्वाचे मानले जाते. सुरक्षेच्या दृष्टीने हे ॲप ‘एंड-टू-एंड एन्क्रिप्शन’ आणि पिन सिक्युरिटीसह येते. या सर्व वैशिष्ट्यांमुळे ‘एक्सचॅट’ हे थेट व्हॉट्सॲप आणि फेसबुक मेसेंजर यासारख्या लोकप्रिय मेसेजिंग ॲप्सना स्पर्धा देणार असल्याचे मानले जात आहे. सध्या ‘एक्सचॅट फक्त आयओएस प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे; मात्र कंपनीकडून लवकरच हे ॲप इतर प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध करून दिले जाईल, असे संकेत देण्यात आले आहेत. आगामी अपडेट्सनंतर हे ॲप सर्व वापरकर्त्यांसाठी खुले होण्याची शक्यता आहे. एलन मस्क यांची ‘एव्हरीथिंग ॲप’ (ऑल-इन-वन ॲप) तयार करण्याची कल्पना गेल्या काही काळात चर्चेत होती.

या ॲपमध्ये मेसेजिंग, व्हिडिओ-ऑडिओ कॉलिंग, पेमेंट, शॉपिंगसह विविध सेवा एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्याचा त्यांचा विचार होता; मात्र एक्सचॅट या स्वतंत्र ॲपच्या लॉंचमुळे मस्क यांनी सध्या त्या संकल्पनेपासून थोडा वेगळा मार्ग स्वीकारल्याचे दिसून येते.

## टेक वर्ल्ड

### व्हॉट्सॲप बनले डिजिटल वॉलेट



व्हॉट्सॲप आता केवळ गप्पा मारण्याचे साधन राहिले नसून ते तुमचे डिजिटल वॉलेटदेखील बनले आहे. व्हॉट्सॲप पे आणि विविध सेवा प्रदात्यांच्या मदतीने तुम्ही आता घरबसल्या, कोणाशीही चॅट करत असताना आपला मोबाईल रिचार्ज करू शकता. या नवीन सुविधेमुळे तुम्हाला रिचार्जसाठी वेगळ्या ॲपवर जाण्याची किंवा दुकानात जाण्याची गरज उरलेली नाही. ही प्रक्रिया कशी पूर्ण करायची, याची स्टेप बाय स्टेप माहिती खालीलप्रमाणे आहे.

● ॲप उघडा: तुमच्या फोनवर व्हॉट्सॲप उघडा. ● पेमेंट सेक्शन: उजव्या कोपऱ्यातील तीन ठिपक्यांवर सेटिंग्जवर क्लिक करून ‘पेमेंट’ निवडा. ● रिचार्ज निवडा: तिथे तुम्हाला ‘मोबाईल रिचार्ज’ हा पर्याय दिसेल, त्यावर क्लिक करा. ● नंबर टाका: ज्या नंबरचा रिचार्ज करायचा आहे तो नंबर टाईप करा किंवा कॉन्टॅक्ट लिस्टमधून निवडा. ● प्लॅन निवडा: तुमचा ऑपरेटर निवडून उपलब्ध रिचार्ज प्लॅन्सची यादी पाहा आणि योग्य प्लॅन निवडा. ● पेमेंट करा: तुमचा युपीआय पिन टाकून पेमेंट पूर्ण करा. तुमचा रिचार्ज लगेच होईल

**चॅटबॉटद्वारे रिचार्ज (कंपन्यांच्या अधिकृत नंबरवरून)**

**भारतातील प्रमुख कंपन्यांनी त्यांचे स्वत:चे चॅटबॉट्स सुरू केले आहेत.**

● जिओ: ७०००७ ७०००७ या नंबरवर ‘हाय’ पाठवा. ● एअरटेल: ५०१०१ ५०१०१या नंबरवर ‘हाय’ पाठवा. ● व्होडाफोन आयडिया: ९६५४२ ९७००० या नंबरवर ‘हाय’ पाठवा.

**कसे करावे?**

● वर दिलेला तुमच्या ऑपरेटरचा नंबर सेव्ह करा आणि त्यावर ‘हाय’ किंवा ‘रिचार्ज’ असा मेसेज पाठवा. ● चॅटमध्ये तुम्हाला रिचार्जचे पर्याय मिळतील. ● तुमचा प्लॅन निवडा आणि व्हॉट्सॲप पे किंवा इतर यूपीआय माध्यमातून पैसे भरा.

**व्हॉट्सॲप रिचार्जचे फायदे**

● वेळेची बचत होते. इतर ॲप्स उघडण्याची कटकट नाही. ● व्हॉट्सॲप पे हे एनपीसीआय आणि युपीआयवर आधारित असल्याने पूर्णपणे सुरक्षित आहे.

● अनेकदा व्हॉट्सपवरून पहिल्या रिचार्जवर आकर्षक कॅशबॅक देखील मिळतो.

● तंत्रज्ञानाची जास्त माहिती नसलेली व्यक्तीही सहज वापरू शकते.

# प्रवासात कोणते कपडे वापराल?

फॅशन पॅशन



पुरुषांच्या कपड्यांबद्दल अनेक आवडी निवडी असल्या, तरी ते तसे फॅशन कमी करतात. त्याच्या कपाटात सामान्यत: जीन्स व टी- शर्ट शिवाय आपल्याला काही सापडत नाही. आपल्याला प्रवास आरामदायी हवा असतो. टी-शर्ट हा प्रवासातील सर्वोत्तम आरामदायी पेहराव मानला जातो. तसेच ते आपल्या बॅगमध्ये सहज बसणारे व स्टायलिश दिसणारे कपडे आहेत.

कंटाळवाण्या दिवसापासून आपल्याला ब्रेक मिळावा म्हणून आपण प्रवास करत असतो. त्यामुळे आपल्याला त्यातून आराम मिळतो. फिरायला गेल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारणे किंवा नवीन शहर एक्सप्लोर करणे असो, छान दिसणे आणि आरामदायी राहणे हे सहज प्रवास अनुभवासाठी आवश्यक आहे; परंतु आज आपण असे काही कपडे पाहणार आहोत, जे आपल्याला प्रवासात आरामदायी वाटतील व आपला प्रवास सुखकर करतील.

● **बेसिक रॉ एज टीज** –बेसिक रॉ एज टीज आपल्यासारख्या लोकांसाठी एक प्रीमियम आणि स्वच्छ लूक देऊ शकतात. आपण पोत, लाइक्रा आणि रंगांच्या बँडसह ते खरेदी करू शकता. लाइक्राने बनवलेले कपडे आपला प्रवास आरामदायी बनवू शकतात त्यासाठी प्रवासात आपण या मटेरियलचे कपडे परिधान करायला हवे.

● **सॉलिड टी-शर्ट** – आपल्याला नेहमीच्या सॉलिड टी-शर्टचा कंटाळा आला असेल तर आपण पॉपकॉर्न कॅज्युअल टीजची निवड करू शकतो. त्यात असणाऱ्या गळ्याची प्रीमियम रचना आपल्याला प्रवासासाठीच सोयीस्कर नाही तर संध्याकाळच्या पार्टीसाठी देखील आरामदायी बनू शकते. पॉपकॉर्नच्या टेक्श्चरमुळे त्याला स्टायलिश लूक मिळतो आणि हेरिंगबोन नेकमुळे नवा लूक आपल्याला मिळू शकतो.

● **ऑल-राउंड मेरिनो वूल टीज** – विविध कार्यक्रम किंवा प्रसंगांसाठी ऑल-राउंड मेरिनो वूल टीज सोबर असतात. हे टीज मेरिनो वूल आणि नायलॉनच्या कॉम्बोने बनवली असून ते अतिशय आरामदायक असतात. ते आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित करण्यात मदत करतात आणि आपली त्वचा संरक्षित ठेवण्यासाठी अँटी-मायक्रोबियल आहेत. प्रवासात आपल्याला घाम व इतर गोष्टींपासून ते लांब ठेवू शकतात. हे टीज स्पर्शाला मऊ, टिकाऊ आणि तरतरीत आहेत.


● **क्विक-ड्राय टीज** – प्रवासात आपल्याला सतत घाम येतो. त्यामुळे आपल्याला प्रवास करण्याचा अधिक वैताग येतो अशावेळी आपण क्विक-ड्राय टीजची चॉईस करू शकतो. त्यामुळे आपल्याला घाम येणार नाही व आपली त्वचा कोरडी राहील. हे टीज मऊ आणि आरामदायी असतात आणि प्रवासात उत्तम पर्याय ठरतात. आपल्या ट्रॅव्हल बॅगमध्ये क्विक ड्राय टीज नेहमी असायला हवेत.

● **क्लासिक पोलो** – कॉलरसह क्लासिक पोलो नेहमीच आपल्या फॅशन शैलीत छान दिसतात. नायलॉन, लोकर इत्यादी वेगवेगळ्या सामग्रीपासून बनवलेले हे टीज स्टायलिश आणि घालण्यास अगदी सोपे आहेत. ते आपल्याला खूप आरामदायी ठेवतात. हे धुण्यास सोपे, चांगले फिटिंग आणि फॅशनेबल आहेत. आपल्या ट्रॅव्हल बॅगमध्ये पोलो ठेवल्याने विमानतळ, रेस्टॉरंट, संध्याकाळच्या पार्ट्यांमध्ये चांगले दिसण्यास मदत होईल आणि आपला फॅशन लूक वाढू शकतो.

# जुने ब्लॅक अँड व्हाईट फोटो करा रंगीत!

रंजक

मित्रांनो, आपल्या जुन्या आठवणी पुन्हा जागवण्याचा मार्ग म्हणजे जुने फोटो पाहणं. पण बरेचदा ते कृष्णधवल असतात. ते रंगीत करता आले तर काय मजा येईल, असं मात्र वाटून जातं. आता यासाठी तुम्ही चॅटजीपीटीचा वापर करू शकता. कृष्णधवल फोटो रंगीत करण्यासाठी ‘चॅटजीपीटी’चा वापर करण्याची पद्धत खूप सोपी आहे. तुमच्याकडील जुने कृष्णधवल फोटो रंगीत करायचे असतील तर ‘चॅटजीपीटी’ च्या मदतीने रंगीत करता येतात. हा नवीन ट्रेंड मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. लोक आपले जुने कौटुंबिक फोटो रंगीत करून घेत आहेत. यासाठी सर्वप्रथम ‘चॅटजीपीटी’ वेबसाइट किंवा मोबाइल ॲपवर जा. ‘चॅटजीपीटी’ची इमेज अपलोडिंगला सपोर्ट करणारी आवृत्ती वापरत असल्याची खात्री करा. आता तुम्हाला रंगीत करायचा असलेला कृष्णधवल फोटो अपलोड करा. ‘चॅटजीपीटी’ला हा ब्लॅक अँड व्हाईट फोटो वास्तविक रंगीत फोटोसारख्या दिसणाऱ्या नैसर्गिक रंगीत व्हर्जनमध्ये रूपांतरित करा’, अशी सूचना द्या. तुमचा नव्याने रंगीत झालेला फोटो समोर तयार होईल..



# टॉपर व्हायचेय, मग या टिप्स फॉलो करा

स्टडी टिप्स

प्रत्येक विद्यार्थ्याला आयुष्यात यश मिळवायचे असते. त्याची अभ्यासाची स्वतःची पद्धत असते. टॉपर विद्यार्थी अभ्यासासाठी काही खास टिप्स फॉलो करतात. त्यामुळे ते अभ्यासात यश मिळवतात. चला पाहूया अशा कोणत्या खुबी वापरल्या जातात...

विद्यार्थ्यांसाठी टिप्स

१. वेळापत्रक तयार कराः वेळापत्रकानुसार अभ्यास करून विद्यार्थी वेळेवर अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात आणि अभ्यासात सुधारणाही करू शकतात. त्यामुळे त्यांना परीक्षेत चांगले गुण मिळतात.

२. पुनरावृत्ती (सराव)ः अभ्यासक्रमाची दोन-तीन वेळा उजळणी करून विद्यार्थी यश मिळवू शकतात. उजळणी करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी गोष्टी सहज लक्षात ठेवता येतात.

३. नोट्स बनवाः यशस्वी विद्यार्थी उजळणी करताना स्वत:च्या नोट्स काढतात. प्रत्येक वेळी ते उजळणी करून त्या विषयाच्या नोट्स आणखी सोप्या करतात. याच्या मदतीने विद्यार्थी परीक्षेपूर्वी नोट्समधून झटपट उजळणी करू शकतात.

४. माईंड मॅप बनवाः अनेकांचा असा विश्वास असतो की माईंड मॅपद्वारे गोष्टी सहज लक्षात ठेवल्या जाऊ शकतात. माईंड मॅप्सच्या मदतीने तथ्ये, तारखा आणि क्रम सहज लक्षात ठेवता येतो.



५. अवघड विषय आधी वाचाः काही लोक कठीण विषयाचा अभ्यास सर्वात शेवटी करायचं ठरवतात. त्यामुळे ते विषय शेवटपर्यंत वाचता येत नाहीत. यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम कठीण विषयांचा अभ्यास केला पाहिजे. नंतर ते सोप्या विषयांचा अभ्यास करू शकतात.

६. दुसऱ्याला शिकवाः तुम्ही शिकलेलं दुसऱ्याला शिकवलं तर तो विषय तुमच्या चांगला लक्षात राहील. आपला मेंदू पूर्वी शिकलेल्या सुमारे ९० टक्के गोष्टी दीर्घ काळासाठी लक्षात ठेवू शकतो.

७. स्वत:साठी अभ्यासाची उद्दिष्टे निश्चित कराः विद्यार्थ्यांनी स्वत:साठी छोटी उद्दिष्टे ठेवली, तर ती साध्य केल्यावर ते यशस्वी होतील. ते त्यांना आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देईल.

८. अभ्यासासाठी एक वेळ ठरवाः यशस्वी होण्यासाठी तुम्हाला कधी अभ्यास करायचा आहे आणि दिवसात कधी ब्रेक घ्यायचा आहे हे ठरवा. अभ्यासासाठी वेळ निश्चित करा. त्यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येते

९. टेस्ट सिरिजः यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्वी मॉक टेस्ट सिरीज सोडवावी: जेणेकरून ते परीक्षेपूर्वी आपल्या तयारीची चाचणी घेऊ शकतील आणि त्रुटी आणि चुका सुधारू शकतील.

१०. योग्य साहित्य निवडाः विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत करून अभ्यास करतात; पण परीक्षेप्रसंगी त्यांना काही आठवत नाही. अभ्यासक्रमात दिलेली पुस्तके आणि तज्ज्ञांनी किंवा शिक्षकांनी सुचविलेल्या पुस्तकांमधूनच तयारी करा. योग्य अभ्यास साहित्य तुमच्या यशासाठी खूप उपयुक्त ठरेल.

# अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरात सुविधांचा बोजवारा; भर उन्हात अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना भयंकर त्रास : राजेंद्र चोपडा

## मोजक्याच लोकांच्या फायद्याचे आर्थिक विषय सोडून नागरी सुविधांकडेही मनपा प्रशासनाने लक्ष द्यावे



नगर – अहिल्यानगर महानगरपालिका सध्या पाणी योजना सक्षमीकरण तसेच मोक्याच्या जागांवर व्यापारी संकुल उभारणीसाठी बँकाकडे कर्ज मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. यामागे नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्याचा हेतू असल्याचे सांगितले जाते. मात्र सध्या शहरात आहे त्याच सुविधांचा बोजवारा उडाला आहे. नालेगाव, अमरधाम येथे असलेल्या विद्युत वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. साफसफाईचा अभाव, जागोजागी पडलेला कचऱ्याचा ढिग, उच्चांकी तापमान असलेल्या ऊन्हात सावलीची व्यवस्था नसणे अशा अनेक गैरसोयींमुळे नागरिकांची कुचंबणा होत आहे. महानगरपालिकेने मोठे प्रकल्प कर्ज घेऊन नाही तर सरकारकडून निधी मिळवून जरूर उभारावेत पण किमान अंत्यविधी होणाऱ्या जागेत पुरेशा सुविधा द्याव्यात अशी मागणी राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

अमरधाम येथील विद्युत् वाहिनीवरील असुविधेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करताना राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे की, नागरिकांची गरज ओळखून मुलतानचंदजी बोरा ट्रस्टने अमरधाम येथे विद्युत दाहिनीची व्यवस्था करून दिली. याठिकाणी स्व. मुलतानचंद बोरा (परदेशी गल्ली) यांचा अर्धपुतळाही बसवण्यात आला. विद्युत दाहिनीमुळे अंत्यसंस्कारांची एक चांगली व्यवस्था झाली. परंतु मागील काही काळापासून महानगरपालिकेला विद्युत वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीचा पूर्ण विसर पडला आहे. स्व. बोरा यांच्या पुतळ्या भोवतीची काच धुळीने पूर्ण काळवंडलेली आहे. त्यांचे नावही काळेकुट्ट पडले आहे. या पुतळा परिसरात घाणीचे साम्राज्य वाढले आहे. शहरातील अन्य मोठ्या व्यक्तिमत्वांच्या पुतळा परिसराचीही अशीच दुरवस्था झालेली आहे.

विद्युत दाहिनीत व्हेंटिलेशनची व्यवस्था नाही. येथील पंखे शॉर्ट सर्किट झाल्याने अनेक महिन्यांपासून बंद आहेत. अंत्यसंस्कारांसाठी आलेल्यांना अक्षरशः गुदमरल्यासारखे होते. बाहेर थांबायचे तर बसायला स्वच्छ जागा नाही. कडक उन्हात तिष्ठत उभे राहावे लागते. तत्कालीन नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात लावलेल्या झाडांची सावलीच काही प्रमाणात दिलासा देते. याठिकाणी महापालिकेकडून केवळ एकच कर्मचारी नियुक्त आहे. विद्युत दाहिनीचे सर्व संचालन हा एकच कर्मचारी करतो. त्यालाही साफसफाई व इतर सुविधा देताना अडचणी येतात. आज मनपाचे अनेक अधिकारी, पदाधिकारी यांच्या दिमतीला मनपाचे अनेक कर्मचारी नियुक्त आहेत. मात्र विद्युत दाहिनीत पुरेशा सुविधा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक कर्मचारी नेमण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. विद्युत दाहिनीच्या देखरेखीसाठी नियुक्त भंडारी नामक व्यक्ती नेमकं काय काम करते याचीही चौकशी झाली पाहिजे.

बोरा ट्रस्टचे अध्यक्ष अभय फिरोदिया हे मोठे उद्योजक असून ते पुण्यात स्थायिक आहेत. त्यांना येथील समस्यांची माहिती नाही. ट्रस्टचे नगरमधील कामकाज पाहण्यासाठी नियुक्त भंडारी या व्यक्तीचेही विद्युत दाहिनीच्या परिसरातील समस्यांकडे दुर्लक्षच झाले आहे. मनपाला विद्युत दाहिनी उभारून देत ट्रस्टने समाजासाठी चांगले काम केले. एवढे असूनही महानगरपालिकेला याठिकाणी साध्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात अपयश येत आहे. नगरकर सहनशील आहेत म्हणून मनपा प्रशासन मनमानी करत आहे. शहराच्या महापौर, उपमहापौरांनी कामकाज सुरू करताना शहराचा भरीव विकास करण्याची ग्वाही दिली. त्यांनीच या अतिशय संवेदनशील विषयात लक्ष घालून अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरातील समस्यांची प्राधान्याने सोडवणूक करण्यासाठी प्रशासनाला आदेश दिले पाहिजेत. अमरधाम येथे नागरिकांना गैरसोयी सहन कराव्या लागत असताना महापालिकेने अमरधामची संरक्षक भिंत पाडून व्यावसायिक गाळे उभारून मलिदा लाटला आहे. पण अमरधाम येथे चांगल्या सुविधा देण्याकडे डोळे झाक केली जाते. महापालिकेने आधी चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देऊन नंतर कर्ज उभारणी, व्यापारी संकुल उभारणी करून काही मोजक्याच लोकांचे विशेषतः नगरसेवकांचे खिसे भरण्याचा उद्योग करावा. नगरकरांना फक्त योग्य नागरी सुविधांची गरज आहे. मनपा आयुक्त सुरूवातीपासून स्वच्छतेबाबत दक्ष असल्याचे दाखवतात. त्यांच्या स्वच्छता मोहिमेचे फोटो वर्तमानपत्रात, सोशल मीडियात दिसतात. परंतु त्यांना शहराच्या विविध भागांसह अमरधाम येथील विद्युत दाहिनीच्या परिसरातील स्वच्छतेचा विसर पडतो. हे नगरकरांचे दुर्दैव आहे. आयुक्तांनी या विषयात गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे.

**शहरातील अंतर्गत रस्त्यांची डागडुजी आवश्यक :** नगर शहरात मागील काही काळात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अनेक रस्त्यांचे अतिशय चांगले काँक्रीटीकरण झाले आहे. शहरात मजबूत रस्त्यांचे जाळे त्यांच्या विशेष प्रयत्नातून होत आहे. त्यामुळे शहराची चांगली प्रतिमा निर्माण होत आहे. विकासकामातून नगर शहराला मेट्रो सिटी करण्यासाठी आ. जगताप काम करत असून नगरकर त्यांचे स्वागतच करीत आहेत. परंतु आ.जगताप दूरदृष्टीने कामं करत असताना मनपा आयुक्त, उपायुक्त, इतर अधिकारी केवळ गलेलठ्ठ पगार घेऊन दिवस ढकलत आहेत की काय अशी परिस्थिती आहे. कारण शहरात विविध भागात अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे जैसे थे आहेत. मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या छोट्या रस्त्यांवरील खड्डे महानगर पालिका प्रशासनाने तातडीने बुजवले पाहिजे. कारण या खड्ड्यातून वाहन चालवताना अपघात होतात. मणके, पाठीचे आजार होतात. मनपाने रात्री ११ नंतर खड्डे बुजवण्याचे काम करावे म्हणजे दिवसा वाहतुकीला अडथळा होणार नाही. यासाठी विविध विभागात डिपार्टमेंटनुसार नियोजन करावे. तसेच भ्रष्ट ठेकेदारांना या कामापासून दूर ठेवावे, अशी मागणी राजेंद्र चोपडा यांनी केली आहे.

**नगरसेवकांनी निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावी :** महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नगरसेवकांनी विकासाची मोठमोठी आश्वासने दिली. आता या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी त्यांनी पावले उचलली पाहिजेत. केवळ पालिकेच्या व्यापारी संकुलात गाळे मिळवण्यासाठी धडपड न करता नागरी सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध होण्यासाठी नगरसेविकांनी काम केले पाहिजे. महापौर, उपमहापौरांनी मध्यंतरी पालिका मुख्यालयात हजेरी घेऊन लेट लतिफ कर्मचाऱ्यांना तंबी दिली. त्याच पद्धतीने कामचुकार आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवरही जरब बसवण्याची गरज आहे. प्रशासन प्रमुख असलेल्या आयुक्तांनी तसेच इतर उपायुक्त, अधिकाऱ्यांनी मूळ कर्तव्य न विसरता नगरकरांना चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न करावेत असे राजेंद्र चोपडा यांनी सांगितले.

# नगरमधून अपहरण झालेल्या 'त्या' मुलीची पुण्यातून सुटका

## सलग ३६ तास पाळत ठेवून आरोपीला ठोकल्या बेड्या

नगर – कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अपहरण झालेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले आहे. 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत कोतवाली पोलिसांनी पुण्याच्या वानवडी परिसरात सलग ३६ तास तपास करत मुलीची सुटका केली आणि संशयित आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले होते. याप्रकरणी संशयित आरोपी प्रदीप उर्फ व्हन्या परशुराम इजगत (रा. रेल्वे स्टेशन, बोहरी चाळ, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध पीडितेच्या पालकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी आणि मुलगी बेपत्ता होते. पोलीस त्यांचा कसून शोध घेत होते.

दरम्यान, आरोपी हा मुलीसह पुणे शहरातील वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत लपून बसल्याची गोपनीय माहिती कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना मिळाली. त्यांनी तातडीने तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल श्वेता परमासागर, पोलीस कॉन्स्टेबल याकूब सय्यद आणि अमोल गाडे यांचे विशेष पथक तयार करून पुण्यात रवाना केले.

पुण्यात पोहोचलेल्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. सलग ३६ तास पाळत ठेवून पोलिसांनी अखेर आरोपी प्रदीप इजगत याला ताब्यात घेतले आणि अल्पवयीन मुलीची सुटका केली. पोलिसांनी आरोपीला अहिल्यानगर येथे आणून गुन्ह्यात अटक केली आहे.

ही कामगिरी पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, उपनिरीक्षक प्रवीण पाटील, श्वेता परमासागर, याकूब सय्यद, अमोल गाडे, राहुल गुंडू आणि नितीन शिंदे यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करत आहेत.

# विळद रेल्वे धक्क्यावर माथाडी कामगारांचा जीव धोक्यात घालून काम करण्यास नकार

नगर – विळद रेल्वे माल धक्का येथे प्लॅटफॉर्म नसताना थेट वॅगनमधून माल जमिनीवर उतरवून पुन्हा ट्रकमध्ये भरण्याचे जीवघेणे काम नोंदित माथाडी कामगारांकडून करून घेण्याचा प्रयत्न होत आहे, असा गंभीर आरोप कामगारांनी केला आहे. धोकादायक काम करताना कामगारांचा मृत्यू झाल्यास दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी ठाकरे शिवसेना कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे यांनी केली आहे.

याबाबत कामगारांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, सहाय्यक कामगार आयुक्त तथा माथाडी मंडळाचे अध्यक्ष रेवणनाथ भिसले यांनी हुंडेकरी वाहतूक ठेकेदार यांच्याशी संगनमत करत कामगार विरोधी आदेश काढला असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. याबाबत कामगारांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन दिले आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देखील निवेदन पाठविण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे, विळद रेल्वे माल धक्का येथे प्लॅटफॉर्म नसताना थेट वॅगनमधून माल जमिनीवर उतरवून पुन्हा ट्रकमध्ये भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे काम अत्यंत धोकादायक असून यामुळे कामगारांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? आजपर्यंत कामगारांनी प्रामाणिकपणे सेवा दिली आहे. मात्र अमानवी आणि जीवघेण्या पद्धतीने काम करण्यास भाग पाडणे चुकीचे आहे. त्याऐवजी वॅगनमधून थेट ट्रकमध्ये लोडिंग करण्याची व्यवस्था करण्यात



विळद रेल्वे माल धक्का येथे माथाडी कामगारांकडून जीवघेणे काम करुन घेण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत निवेदन देताना विलास उबाळे यांच्यासह जयराम आखाडे, विनोद शिरसाठ, लक्ष्मण पुलावळे आदी.

यावी. तसे पत्र संबंधित हुंडेकरी व वाहनधारकांना प्रशासनाने निर्देश द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगार कार्यालयाचे काही ठराविक अधिकारी जाणीवपूर्वक पालकमंत्री यांना चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत की काय अशी शंका आम्हाला आहे. पालकमंत्र्यांनी कामगारांशी संवाद साधावा. बैठक लावावी. कामगारांना न्याय देण्याची भूमिका घ्यावी, असे विलास उबाळे यांनी म्हटले आहे.

निवेदनात सहाय्यक कामगार आयुक्तांच्या ८ मे २०२६ च्या आदेशावर तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. स्थानिक नोंदित माथाडी कामगारांनी काम न केल्यास इतर कामगारांकडून काम करून घेण्यास व नव्या माथाडी कामगारांची नोंदणी करण्यास मुभा देण्यात आल्याचा उल्लेख करत, स्थानिक भूमिपुत्र कामगारांना हटवून परप्रांतीय कामगारांना आणण्याचा कट रचला जात आहे, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यासाठी प्रशासन व काही हुंडेकरी यांच्यात संगनमत असल्याचा आरोपही कामगारांनी केला. माथाडी मंडळ कामगारांच्या संरक्षणासाठी आहे की कामगारांना उद्‌वस्त करण्यासाठी? असा सवाल उपस्थित करत, गरज पडल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात दाद मागण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी विलास उबाळे यांच्यासह जयराम आखाडे, विनोद शिरसाठ, लक्ष्मण पुलावळे, दिपक काकडे, बाबासाहेब वैरागर, देवराम शिंदे, गोरख कार्ले, परशुराम शिंदे, विजय वैरागर, किशोर खुडे, राहुल त्रिभुवन, काळू निंबाळकर उपस्थित होते.

# नगरमध्ये २३ व २४ मे रोजी अमृतपेठ प्रदर्शनाचे आयोजन

नगर – राज्य शासनाच्या अमृत या संस्थेतर्फे 'अमृतपेठ – थेट बाजारपेठ' या विशेष प्रदर्शनाचे आयोजन अहिल्यानगर शहरात २३ व २४ मे रोजी करण्यात आले आहे. चितळे रोड वरील ऋग्वेद भवन हॉल येथे सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत खुले आहे. स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी हा विशेष उपक्रम राज्य शासनाच्या मार्फत राबवला जातो. नगर शहरात गेल्या मार्च महिन्यात झालेल्या या प्रदर्सानास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला होता. शहरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन अमृत संस्थेचे अहिल्यानगर जिल्हा व्यवस्थापक सागर भोपे यांनी केले.

'अमृतपेठ – थेट बाजारपेठ' या विशेष प्रदर्शनामध्ये सहभागी झालेल्या स्थानिक लघु उद्योजकांचे ३० स्टॉल्स असून त्यामध्ये महिला उद्योजकांना प्राधान्य देण्यात आले अहे. नागरिकांना विविध प्रकारचे दर्जेदार स्वदेशी व घरगुती उत्पादने माफक दरात थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये विविध खाद्यपदार्थ, दैनंदिन वापराच्या वस्तू, कपडे, आयुर्वेदिक उत्पादने, कॉस्मेटिक, ज्वेलरी व हस्तकलेच्या वस्तूंचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी ९७६६६२२२७४ या मोबाईलवर संपर्क साधावा.

# नगर-पुणे महामार्गावर नारायणगव्हाण येथील महामार्गाचे चौपदरीकरण व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ग्रामस्थांचे रस्त्यावर लोटांगण आंदोलन



नगर – नगर-पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील प्रलंबित चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे, भूधारकांना योग्य मोबदला द्यावा तसेच वारंवार होणाऱ्या अपघातांना जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, अशा विविध मागण्यांसाठी नारायणगव्हाण येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन बबन शेळके यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर चाळीस डिग्रीच्या पुढील तापमानात डांबरी रस्त्यावर लोटांगण आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, नारायणगव्हाण येथील महामार्गाचे चौपदरीकरण अनेक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. वाढती वाहनसंख्या आणि अरुंद रस्ता यामुळे गाव परिसरात वारंवार अपघात होत असून शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सातत्याने छोटे-मोठे अपघात घडत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थ व सामाजिक संघटनांनी वेळोवेळी आंदोलन आणि पाठपुरावा करून प्रशासनाचे लक्ष वेधले. सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांच्या प्रयत्नांतून ९४५ मीटरपैकी ८१५ मीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले. मात्र अद्याप १२० ते १५० मीटरचे काम प्रलंबित आहे. नारायणगव्हाण गाव रस्त्याच्या मध्यभागी असल्याने ग्रामस्थांचा या मार्गावर मोठ्या प्रमाणात दळणवळणासाठी वापर होत असतो. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी उर्वरित चौपदरीकरण तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच भूधारकांना योग्य मोबदला द्यावा, कामात दिरंगाई करणाऱ्या निष्क्रिय व कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि भविष्यात महामार्गावर कोणतीही दुर्घटना घडल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. हे प्रलंबित काम तातडीने पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल तसेच शासनाची अंत्ययात्रा काढण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला.

यावेळी शरद पवळे, शिवाजी नवले, संतोष कोहकडे, रमेश कोहकडे, रामचंद्र अवचिते, संजय साबळे, बबनराव गुंड, किरण ठुबे, बाजीराव जगदाळे, जनार्दन खोबरे, सचिन कांडेकर, गजेंद्र सरडे आदी उपस्थित होते.

# परिचारिका ह्या सेवा, समर्पण आणि आरोग्य सेवेचा मुख्य कणा

## महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त सत्कार सोहळा

नगर – परिचारिका या आपल्या कुटुंबाची, परिवाराची तसेच हॉस्पिटलची जबाबदारी सांभाळून रुग्णांची सेवा करत असतात. कोरोनाच्या महाभयंकर संकट काळामध्ये आपल्या जीवाची परवा न करता दुसऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्यांनी अहोरात्र काम केले. देशाच्या आरोग्य सेवेमध्ये परिचारिकांचा मोठा वाटा असून त्या समाजातील सेवा, समर्पण आणि आरोग्य सेवेचा मुख्य कणा आहेत. परिचारिकांच्या माध्यमातून महापालिकेची आरोग्य सेवा नागरिकांच्या घरापर्यंत घेऊन जाण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.



अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, मनपा महिला बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष सुनील कटारिया, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, पुष्कर कुलकर्णी, सुनील मुथा, राजेश परदेशी, अमर गुरव, मनोरमा थोरात, सुवर्णा शेलार, मनीषा सोनवणे, वर्षा कुलथे, संगीता कावरे, डॉ. वृषाली अरुण, शितल मडावी, प्रतिभा राऊत, कविता खिलारी, शिरीन शेख आदींसह अधिकारी, कर्मचारी व परिचारिका उपस्थित होत्या.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महापालिकेच्या परिचारिकांच्या आरोग्य सेवेला महानगरपालिकेच्या वतीने सलाम आहे. पूर्वी बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये सुमारे ३००० प्रसूती होत होत्या, आता त्या १५०० वर आल्या आहेत. पुढील काही दिवसांमध्ये बाळासाहेब देशपांडे दवाखाना नवीन ठिकाणी स्थलांतरित होणार असून रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यामध्ये बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचा नावलौकिक परिचारिकांमुळेच मिळाला आहे. त्यांच्या माध्यमातून बहुतांश प्रसूती नॉर्मल पद्धतीने केल्या जात होत्या. यापुढील काळातही महानगरपालिकेच्या माध्यमातून महिलांना अधिकाधिक आरोग्य सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

ते पुढे म्हणाले की, आरोग्य संदर्भातील माहिती शासनाला ऑनलाइन पद्धतीने तातडीने द्यावी लागते. त्यामुळे पुढील काळात परिचारिकांना टॅब दिले जाणार असून त्या माध्यमातून अधिक जलद गतीने आरोग्याची माहिती शासनापर्यंत पोहोचवता येईल.

दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त परिचारिकांचा गुणगौरव व सत्कार सोहळा होणे गरजेचे आहे. यासाठी रोटरी क्लब यांनी पुढाकार घेऊन महापालिकेच्या परिचारिकांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याचे काम केले आहे. पुढील काळात महानगरपालिका आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवणार आहे. पावसाळ्यामध्ये राबविण्यात येणारे डेंग्यूमुक्त अभियान यशस्वी करण्याचे काम परिचारिका करत असतात. त्यामुळे शहरामध्ये डेंग्यू रुग्णांची संख्या दिवसेंदिवस कमी होताना दिसत आहे.

सुनील कटारिया म्हणाले की, आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त रोटरी सेंट्रलच्या माध्यमातून महापालिकेच्या परिचारिकांचा सन्मान सोहळा झाला. चांगली आरोग्य सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गुणगौरव करणे गरजेचे आहे.

यावेळी उपसभापती वर्षाताई सानप यांनी परिचारिका दिनानिमित्त शुभेच्छा देत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन कविता खिलारी यांनी मानले.

# जिल्ह्याच्या तहसिलसह प्रांतकार्यालयातील शेतरस्ता प्रकरणे तातडीने निकाली काढा



नगर – जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) कार्यालयांमध्ये शेतरस्त्यांच्या शेकडो प्रकरणांचा अंतिम निकाल महिनोनमहिने प्रलंबित असल्याने शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. या सर्व प्रकरणांवर पुढील ३० दिवसांत निर्णय न घेतल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे 'शेतकरी रस्ता हक्क आंदोलन' छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात चळवळीचे अध्यक्ष शरद पवळे व उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन सादर केले. या निवेदनाच्या प्रती नाशिक विभागीय आयुक्त तसेच मुंबई येथील महसूल विभागाच्या मुख्य सचिवांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम १४३ तसेच मामलेदार कोर्ट ॲक्टच्या कलम ५/२ अंतर्गत दाखल असलेल्या शेतरस्ता प्रकरणांवर केवळ तारखांवर तारखा दिल्या जात आहेत. पीक पेरणी व काढणीच्या हंगामात शेतकऱ्यांना रस्त्याची अत्यंत आवश्यकता असताना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे शेतीची कामे अडचणीत आली आहेत. तसेच, प्रांताधिकाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या अनेक आदेशांमध्ये रस्त्याची लांबी, रुंदी, चतु:सीमा अथवा नकाशा स्पष्ट नमूद नसल्याचा आरोपही चळवळीने केला आहे. यामुळे प्रत्यक्षात रस्त्याचा ताबा देताना महसूल व पोलिस प्रशासनाला अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतरस्ता हा केवळ कायदेशीर विषय नसून तो शेतकऱ्यांच्या जगण्याशी निगडित मूलभूत प्रश्न आहे. प्रशासनाने संवेदनशीलतेने याकडे पाहण्याची गरज आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

**चळवळीच्या प्रमुख मागण्या :** जिल्ह्यातील सर्व प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांवर ३० दिवसांत अंतिम निर्णय घेण्यासाठी विशेष मोहीम राबवावी., मंजूर रस्त्यांचे आदेश हे मोजणी नकाशासह स्पष्ट व अंमलबजावणीयोग्य असावेत., विनाकारण प्रकरणे लांबवणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी.

यावेळी राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे, संपर्क प्रमुख बाळासाहेब थोरात, मार्गदर्शक पोपट शेळके, आंबादास आव्हाड, मनोहर मतकर, विठ्ठल करमड, विठ्ठल निर्मल, आशाबाई वाघ, कनिफनाथ कदम, पंडित मामा, सागाजी आयनार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

शेतकरी हा देशाचा कणा आहे. त्याचा रस्ता अडवणे म्हणजे त्याचा श्वास रोखण्यासारखे आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर त्रस्त शेतकऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा शरद पवळे यांनी दिला.

